**भावार्थ :** ज्याला प्रभू परमात्मा समजावून सांगतो त्यासच ते समजते. ज्याला प्रभू परमात्मा ज्ञान देतो त्यालाच ज्ञान प्राप्त होते. त्याला सत्य काय, असत्य काय, शाश्वत काय अशाश्वत काय आदी सर्व ज्ञान प्राप्त होते. नुसते बोलत बसणे हे मायेचेच कृत्य आहे. जीव मायेतच झगडत राहतो. प्रभू परमात्म्याच्या आज्ञेनेच सर्व जीवांची निर्मिती झाली. त्यांचे सर्व विचारही तो जाणतो. नानक सांगतात, प्रभू परमात्मा ज्यास अविनाशी असे नामाचे दान देतो त्याची मायामूलक भ्रांती नष्ट होते. ॥२॥

**॥ पउड़ी ॥**

**हउ ढाढी वेकारु कारै लाइआ ॥ राति दिहै कै वार धुरहु फुरमाइआ ॥**
**ढाढी सचै महलि खसमि बुलाइआ ॥ सची सिफति सालाह कपड़ा पाइआ ॥**
**सचा अंम्रित नामु भोजनु आइआ ॥ गुरमती खाधा रजि तिनि सुखु पाइआ ॥**
**ढाढी करे पसाउ सबदु वजाइआ ॥ नानक सचु सालाहि पूरा पाइआ ॥२७ ॥सुधु ॥**

(श्री. गु. ग्रं. सा. १५०)

**शब्दार्थ : ढाढी –** कीर्ती गाणारा; **कारै –** शुभकार्य; **दिहै –** दिवसा; **वार –** वार; **धुरहु –** प्रभूकडून; **सिफति –** कीर्ती; **सालाह –** स्तुती; **खाधा –** खाले; **पसाउ –** प्रसार, प्रचार.

**भावार्थ :** मी प्रभू परमात्म्याचे गुणगान करणारा चाकर आधी बेकार होतो पण प्रभूने मला नामाचे शुभकार्य करावयास लावले. त्याने अशी आज्ञा केली की तू रात्रंदिवस प्रत्येक दिवशी माझे गुणगान कर. त्याचे सदैव गुणगान केल्यामुळे मला प्रभूने आपल्या सत्य दरबारात बोलावून वस्त्रे देऊन माझा सत्कार केला. मला भोजनरूपाने अमृत नाम दिले. सतगुरूकृपेने असे भोजन करून जो तृप्त होतो त्यास सुख प्राप्त होते. अशा ह्या गायकाने प्रभुनामाचे गायन करून त्याचा सर्वत्र प्रसार केला. गुरू नानक सांगतात, ज्याने सत्यरूप प्रभू परमात्म्याची स्तुती केली त्याने त्या पूर्ण प्रभूस प्राप्त केले. ॥२० ॥शुद्ध ॥

खंड १ [ ४५६ ]

# परिशिष्ट – १

# श्री गुरू नानक देव यांचे संक्षिप्त चरित्र

आपला भारत देश हा देवभूमी, धर्मभूमी म्हणून अनादी कालापासून गौरवान्वित झाला आहे. भारतातून वेदाच्या रूपाने साऱ्या जगात ज्ञानाचा प्रकाश पसरला. मानवाचा पशुत्वाकडून मानवत्वाकडे व मानवत्वाकडून ईश्वरत्वाकडे प्रवास सुरू झाला.

प्रभू परमात्म्याने सृष्टी निर्माण करताना भारतासाठी एक वैशिष्ट्यपूर्ण कार्य नेमून दिले आहे. ते कार्य म्हणजे जगात सत्यधर्माची स्थापना करणे हे होय. त्याप्रमाणे आपल्या पूर्वसुरींनी अथक विचार करून जगास सत्यज्ञानाचा, आत्मज्ञानाचा प्रकाश दिला. मानवी जीवनाचा उद्देश समजावून दिला. त्यांनी बाहू उभारून जगास सांगितले की, ''हे मानवा! तू पापी नाहीस. तू तर अमृताचा पुत्र आहेस. ज्याने ही सारी सृष्टी निर्माण केली त्या प्रभू परमात्म्याची परमज्योत तुझ्याही अंतरात तेवत आहे. उठ! जागा हो! आपले आत्मस्वरूप जाण. मायेच्या मोहपाशातून मुक्त हो. पशुभाव टाकून देऊन ईश्वरत्वाकडे वाटचाल कर. आपली आत्मज्योत परमज्योतीत विलीन कर.'' हाच मानव जन्माचा उद्देश आहे. हेच भारतीय संस्कृतीचे अंतिम उद्दिष्ट आहे.

**सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु माकश्चित दुःखमाप्नुयात ।।**

''सर्व जीवांना सुख प्राप्त होवो. सर्व जीव आरोग्यपूर्ण निरामय जीवन जगोत. सर्वांना सर्वत्र शुभ गोष्टीचे दर्शन घडो. सर्वांचे कल्याण होवो. कोणाही जीवाला यत्किंचितही दुःख भोगावे लागू नये.''

सर्व विश्वाच्या कल्याणाची, सर्व जीवांच्या मांगल्याचीच मनोकामना भारतीय संस्कृतीने सदैव बाळगली आहे. श्री ज्ञानेश्वर माउलींनी सुद्धा आपल्या पसायदानात परमेश्वराकडे हेच मागणे मागितले आहे. ते म्हणतात.

**दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।**
**जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात।।**

अशा तऱ्हेने भारतीयांनी सदैव वैश्विक एकात्मतेचा संदेश दिला आहे. पण हाय रे दैवा! भारतीय माणूसच आपल्या पूर्वसुरींचा हा संदेश विसरून, खरा धर्म विसरून मोहमायेच्या जाळ्यात अडकून भौतिक सुखात मग्न झाला. ह्या धर्म ग्लानीमुळेच भारत परकीय आक्रमकांना बळी पडला.

**नानक जन्माच्या पूर्वीची परिस्थिती**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर श्री गुरू नानक देवांच्या जन्मापूर्वी भारताची व विशेषतः पंजाब प्रांतातील परिस्थिती काय होती ते आपण जाणून घेऊ.

भारतावर फार पूर्वीपासून वायव्य सरहद्दीवरून बोलन खिंडीतून व खैबर खिंडीतून मुस्लिम आक्रमणे होत आली आहेत. त्या वेळी भारत हा सुवर्णभूमी होता. अरब व्यापाऱ्यांनी भारताच्या संपन्नतेचे वर्णन मुस्लिम देशात केले. त्यामुळे मुस्लिम आडदांड लुटारूंच्या टोळ्या पंजाबात घुसून वारेमाप संपत्ती लुटून नेत. पुढे तर महमद कासीम ह्या केवळ वीस वर्षांच्या पोराने सिंधचे हिंदू राज्य जिंकले व तो राजा दाहिरच्या राण्यांना व राजकन्यांना बळजबरीने घेऊन गेला. गझनीच्या महमदाने अठरा वेळा स्वाऱ्या करून पूर्वेस काशीपर्यंत तर गुजरातेत सोमनाथपर्यंत सारा मुलूख लुटून-जाळून-पोळून वैराण

केला. एकट्या सोमनाथमधून १७२०० मण सोने लुटून नेले असे इतिहास सांगतो. हजारो मंदिरे उद्ध्वस्त केली. रक्ताचे पाट वाहिले. अनेकांना सक्तीने बाटवले. हजारोंना गुलाम म्हणून गझनीच्या बाजारात प्रत्येकी अडीच रुपयास विकले. महमद घोरीने इ. स. ११५० मध्ये दिल्ली येथे आपले राज्य स्थापले. तेव्हापासून नानक जन्मापर्यंत म्हणजे सुमारे चारशे वर्षे मुस्लिम सत्ता भारतात स्थिर झाली होती. ह्या मुस्लिम आक्रमणाची सर्वात जास्त झळ भारतीय संस्कृतीचे उगमस्थान अशा ज्ञानभूमी, धर्मभूमी पंजाबला बसली. ह्या मुस्लिम अत्याचाराचे हृदयद्रावक वर्णन पुढे श्री गुरू नानक देवांनी आपल्या एका पदात खालीलप्रमाणे केले आहे. ते म्हणतात.

**कलिकाती राजे कासाई धरमु पंख करि उडरिआ ।।**
**कूडु अमावस सचु चंद्रमा दिसे नाही कह चड़ि आ ।।**
**हउ भालि विंकुनी होई ।। आधेरै राहुन कोई ।।**
**विचि हउमै करि दुखु रोई ।। कहु नानक किनि बिधि गति होई ।।**

''ह्या कलियुगात सुरा (हिंसा) हाच मानवी जीवनाचा प्रतीक बनला आहे. राजा कसाई झाला आहे. त्यामुळे धर्म पंख लावून जगातून निघून गेला आहे. असत्याच्या अमावास्येच्या रात्री सर्वत्र अधर्म माजला आहे. हे सर्व पाहून माझा जीव व्याकूळ झाला आहे. मला कोणताच मार्ग दिसत नाही. अहंकाराने सारी जनता दु:ख भोगत आहे. नानक म्हणतात, ह्या घोर संकटातून जीवांना कोण मुक्त करणार ?''

श्री गुरू नानक देवांच्या जन्मापूर्वी पंजाबातीलच नव्हे. तर साऱ्या भारतातील हिंदू समाजाची घोर अवनती झाली होती. जातिभेद, स्पृश्यास्पृश्य भेद, विटाळ चांडाळाच्या भ्रामक समजुती, सोवळे ओवळे यातच सारा धर्म अडकून पडला होता. पंडित लोक शुष्क तत्त्वचर्चेत आपली बुद्धी खर्च करत होते. पुरोहित वर्ग लोकांना कर्म-कांडात अडकवून, सामान्य जनांना फसवून पैसा कमवत होते. क्षत्रिय वर्ग धर्माचे रक्षण करण्याऐवजी मुस्लिम शासकांच्या हातात हात घालून आपल्याच धर्मबांधवांवर अत्याचार करण्यात धन्यता मानत होते. अशा प्रकारे श्री गुरू नानक देवांच्या जन्माच्या वेळी घोर तमोयुग अवतरले होते. भारतात धर्म ग्लानी आली होती.

श्रीमत् भगवत गीतेत असे सांगितले गेले आहे की,

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानम अधर्मस्य तदात्मानम् सृजात्महम् ।।**
**परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभावामि युगे युगे ।।**

''जेव्हा जेव्हा धर्मास ग्लानी येते, तेव्हा तेव्हा धर्माच्या पुनर्स्थापनेसाठी, सत्याच्या रक्षणार्थ दुष्टांचा नाश करून, साधुसंतांचे रक्षण करण्यासाठी मी युगानुयुगे जन्म घेतो.''

ह्या उक्तीप्रमाणे '**धरम चलावन संत उबारन**' श्री गुरू नानक देवांचा जन्म झाला.

**श्री गुरू नानक देवांचे जीवन**

श्री गुरू नानक देवांचे चरित्र सर्वप्रथम त्यांचे परमशिष्य व शिखांचे दुसरे गुरू श्री गुरू अंगददेव यांनी लिहिले आहे. त्यांच्या ह्या लेखनाने मानव जातीवर फार मोठे उपकार झाले आहेत. श्री गुरू नानक देवांच्या चरित्राची अन्य साधने म्हणजे, १) बालाजी जनमसाखी, २) मिहरबान जनमसाखी, ३) भाई मणिसिंध लिखित ग्यान रत्नावली, ४) भाई गुरुदासजी दी

वारां. तसेच मुस्लिम लेखक शेख मोहंमद मोहसीन (१६१५-१६७०) ऊर्फ 'फानी' यांनीही आपल्या 'दबिस्तान-इ-मझहिब' या ग्रंथात श्री गुरू नानक देवांच्या उज्ज्वल चारित्र्याबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत.

श्री गुरू नानक देवांच्या जीवनात चार महत्त्वाचे कालखंड दिसून येतात ते असे.

**१) तलवंडी पर्व –** यात श्री गुरू नानक देवांचा जन्म, बालपण, शिक्षण आदी गोष्टींचा समावेश आहे.

**२) सुलतानपूर पर्व –** यात श्री गुरू नानक देवांचा गृहस्थाश्रम, त्यांना झालेला ईश्वरी साक्षात्कार, ह्या गोष्टींचा समावेश होतो.

**३) उदासी पर्व –** हा कालखंड श्री गुरू नानक देवांच्या जीवनातील प्रदीर्घ व अत्यंत महत्त्वाचा कालखंड होय. ह्याच कालखंडात त्यांनी संपूर्ण भारताचाच नव्हे तर श्रीलंका, तिबेट, चीन व पश्चिम आशिया खंडातील मुस्लिम देशांचा प्रवास केला आहे. ह्या कालखंडात मुमुक्षू नानकाचे परिपक्व धर्म संस्थापक श्री गुरू नानक देवांच्यात रूपांतर झाले आहे.

**४) करतारपूर पर्व –** या पर्वात श्री गुरू नानक देवांनी धर्मपीठ स्थापन करून धर्मप्रचाराचे कार्य केले आहे, आदर्श मानवी जीवन कसे असावे ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण घालून दिले आहे.

आता ह्या प्रत्येक पर्वाचे आपण सखोल विवेचन करू.

## तलवंडी पर्व

श्री गुरू नानक देव यांचा जन्म वैशाख शुद्ध ३ संवत १५२६ (१५ एप्रिल १४६९) या दिवशी तलवंडी राइभोइ या गावी झाला. सांप्रत हे गाव पाकिस्तानात असून त्यास 'नानकाना साहिब' असे म्हटले जाते.

त्यांच्या पित्याचे नाव कल्याणमल मेहता असे असून ते काळू मेहता ह्या नावाने संबोधले जात. ते बेदी कुलातील (बेदी म्हणजे वेदाध्यायन करणारे) असून ते वर्णाने क्षत्रिय म्हणजेच खत्री होते. त्यांचा तलवंडी येथे व्यापार व शेती हा व्यवसाय होता. नानकांच्या आईचे नाव 'तृप्ती देवी' असे होते. त्या आपल्या नावाप्रमाणे अत्यंत तृप्त म्हणजे समाधानी वृत्तीच्या होत्या. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्या रामनामात तल्लीन होत. बाल नानकही लहानपणापासून रामनाम, भजन, कीर्तन व ईश्वर उपासनेत रंगून जात असे. त्याला साधू, संन्यासी, फकीर, गोसावी यांच्याबद्दल फार कुतूहल वाटत असे. तो आपल्या बरोबरीच्या मुलांना घेऊन भजन-कीर्तनात रंगून जात असे. तो जे हाती येईल ते साधू संन्याशांना देऊन टाकी. त्याच्या ह्या गोष्टी इतरांना चमत्कारिक वाटत. पण बाल नानकास मात्र त्यात परमानंद वाटे.

**शिक्षण –** नानक आता शाळेत जाण्याच्या वयाचा झाला. नानकाने शाळा शिकून व्यावहारिक ज्ञान प्राप्त करून पुढे आपली शेती व व्यापार वाढवावा अशी काळू मेहतांची इच्छा. म्हणून त्यांनी नानकास पंडित गोपाळ यांच्या पाठशाळेत घातले. पंडित गोपाळ हे हिंदी, संस्कृत व पंजाबी भाषेचे पंडित होते. त्यांच्याकडे नानकाचे शिक्षण सुरू झाले. नानकाची बुद्धी अत्यंत कुशाग्र होती. ग्रहणशक्ती तीव्र होती. तो एकपाठी होता. त्यामुळे तो गोपाळ गुरुजींचा लाडका विद्यार्थी झाला.

एक दिवस पंडित गोपाळ गुरुजी मुलांना काही शिकवत होते. पण नानक आपल्या पाटीवर काहीतरी लिहीत होता. गोपाळ गुरुजींनी ते पाहिले व ते आश्चर्यचकित झाले. कारण ते एक काव्य होते. त्यात प्रत्येक अक्षराचा आध्यात्मिक अर्थ दिला होता. हेच काव्य 'पटीलिखी' म्हणून श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये पृष्ठ क्र. ४३२ वर अंकित केले आहे. त्या वेळी नानकाचे वय अवघे सात वर्षांचे होते. पुढे त्यांनी विपुल काव्यरचना केली आहे. पण श्री गुरू नानक देवांनी रचलेले हे पहिले काव्य म्हणून त्यास विशेष महत्त्व आहे. गोपाळ गुरुजींनी विचारले, ''बाळ नानक, तू हे कसे लिहिलेस ? नानक उत्तरला, ''लिहिणारा मी कोण ? लिहिणारा व लिहवून घेणारा तो प्रभू परमात्माच आहे. लिहिणारे हातही त्याचेच आहेत. तोच आपल्या हाताने आपले गुणवर्णन लिहीत आहे. त्यानेच ही सारी सृष्टी निर्माण केली आहे. त्यानेच दिलेल्या वाणीने

त्याचेच भजन करायचे.'' केवढा हा उदात्त विचार. हे नानकाचे बोल ऐकून पंडित गोपाळ थक्क झाले. येथेच नानकाचे शालेय शिक्षण संपले.

त्या काळी पंजाबवर मुसलमानांचे राज्य होते. व्यवहारात फारशी व अरबी भाषेचा उपयोग केला जात असे. मुलाने ह्या भाषा शिकून व्यवहारी जगात नाव कमवावे म्हणून काळू मेहतांनी नानकास मौलवी कुतुबुद्दिन यांच्याकडे पाठवले. तेथे नानक फारशी व अरबी भाषा शिकले. त्याची ग्रहणशक्ती व तीव्र बुद्धी पाहून मौलाना खूष झाले. पण नानकाचे प्रश्न ऐकून ते हैराण होत. नानक विचारी, ''सारी माणसे जर त्या एका अल्लाहची लेकरे आहेत. तर हिंदू व मुसलमान भाईभाईच आहेत ना ? मग मुसलमान हिंदूंची कत्तल का करतात ? त्यांच्यावर जुलूम का करतात ? अल्लाह जर सर्वव्याप्त आहे तर मंदिर वा मशीद असा फरक का ? तसेच आपण त्यास मंदिरात वा मशिदीतच का पाहतो ? त्यासाठी एकमेकांशी का भांडतो ? मौलवीजी मला असे शिकवा की मी त्या पवित्र अल्लाहशी एकरूप होईन.'' मौलवी त्याचे हे विचार ऐकून विचारमग्न झाले, ते काळू मेहतांना भेटले व त्यांना सांगितले, ''खत्रीजी, आपला मुलगा हा प्रत्यक्ष देवदूतच आहे. सत्यधर्माच्या स्थापनेसाठीच त्याचा जन्म झाला आहे. आजपर्यंत तो माझा शिष्य होता. आता तो माझा गुरू व मी त्याचा शिष्य.'' झाले येथे त्याचे लौकिक शिक्षण संपले.

**नानकाची मुंज –** आता प्रथेप्रमाणे नानकाची मुंज करावी असे काळू मेहतांनी ठरवले. मुंजीचे बाकी विधी पार पडले. आता जानवे घालण्याची वेळ आली. गुरुजींनी सुताचे जानवे नानकापुढे धरले व ते गळ्यात घालावयास सांगितले. नानक म्हणाला, ''हे जानवे मला काय कामाचे. हे मळणार, जळणार, तुटणार. मला असे जानवे द्या जे कधी मळणार नाही. तुटणार नाही. जळणार नाही.''

**दइआ कपाह संतोखु सूतु जतु गंठी सतु वटु ।।**
**एहु जनेऊ जीअ का हई त पाडे घतु ।।**
**ना एहु तुटै न मलु लगै ना एहु जलै न जाइ ।।**
**धंनु सु माणस नानका जो गलि चले पाइ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४७१)

दयारूपी कापसापासून संतोषरूपी धागा विणून त्यास संयमरूपी गांठ असेल असे जानवे असेल तर ते मला द्या. असे जानवे कधी मळणार नाही. तुटणार नाही. जळून जाणार नाही. ज्या व्यक्तीने असे जानवे परिधान केले आहे, तो धन्य होय ! बाल नानकाचे हे ज्ञानयुक्त बोलणे ऐकून सारे लोक अवाक झाले.

**गुराखी नानक –** सर्व उपाय थकले. नानकास कशात तरी गुंतवून ठेवले तर तो संसारात रमेल, असे काळू मेहता यांना वाटले. नानकाला रानावनात हिंडण्यात, निसर्गाच्या सान्निध्यात राहणे आवडते. म्हणून काळू मेहतांनी त्यास गुरे चरावयास नेण्यास सांगितले. नानक आता गुरे घेऊन रानात जाऊ लागला. गुरे रानात मोकाट सोडून नानक एखाद्या झाडाखाली बसून ईश्वर चिंतनात निमग्न होत असे. तेथे त्याची समाधी लागून जाई.

एके दिवशी नानक समाधिमग्न असता गुरे शेजारच्या शेतात घुसली. त्यांनी सारे पीक खाऊन, तुडवून नष्ट केले. शेतकरी गावचा मुख्य रायबुलार यांच्याकडे तक्रार घेऊन गेला. रायबुलार काळू मेहता व इतर शेतकऱ्यांना घेऊन समक्ष वस्तुस्थिती पाहण्यासाठी शेताकडे गेले. पण पाहतात तो काय? पिकास जराही हानी पोहोचली नव्हती. उलट पीक पहिल्यापेक्षा अधिकच तरारलेले दिसले. हा चमत्कार पाहून शेतकऱ्याने नानकाचे पाय धरले व क्षमा मागितली. सर्वांना नानकाच्या अंगी वसत असलेल्या दैवी शक्तीचा प्रत्यय आला. पण आता काळू मेहतांनी नानकास गुरे चरावयास नेण्यास मात्र मनाई केली.

**नानकांचा आजार**

एकदा नानक आजारी पडले. उदास दिसू लागले. त्यांचे खाण्यापिण्यावरील लक्ष उडाले. ते दिवसेंदिवस क्षीण

होऊ लागले. हे पाहून काळू मेहता चिंतित झाले. त्यांनी गावातील निष्णात वैद्यास पाचारण केले. ते कोणताही रोग बरा करतात अशी त्यांची ख्याती होती. त्यांनी नानकास तपासले. त्यांना कोणतेही रोगलक्षण दिसले नाही. त्यांची मती कुंठीत झाली. ते विचारमग्न झाले. नानक म्हणाले, ''वैद्यराज, मला कोणतीही शारीरिक व्याधी झालेली नाही. मला एका काळजीने व्यापले आहे. वास्तविक परमात्म्याने माणूस जन्म अशासाठी दिला आहे की त्याने संसाराचे दु:ख दूर करावे. पण तो तर विपरीतच वागत आहे. जरा कोठे शक्ती, सत्ता प्राप्त झाली की तो दुसऱ्यावर जुलूम, जबरदस्ती करू लागतो. इतरांना आपले गुलाम करतो. दुसऱ्यावर आपला धर्म लादतो. सारा हिंदुस्थान ह्या रोगाने ग्रासला आहे. कोण ह्यातून मानवाची मुक्तता करील ? कोण त्यांना मानवी जीवनाचा खरा उद्देश समजावून देईल ? आहे तुमच्या जवळ ह्यावर इलाज ?'' वैद्य निरुत्तर झाले. एक उसासा सोडून नानक म्हणाले, ''अखेर हे कार्य मलाच करावे लागेल. त्याचीच चिंता मला लागली आहे.''

**सच्चा सौदा –** काळू मेहता आता मात्र चिंतित झाले. नानकाचे संसारात लक्ष कसे लागेल ? तो व्यवहारात नावलौकिक कसा कमवील ? आपला व्यापार पुढे कसा चालवील ? ह्या चिंतेने काळूराम व्यथित झाले. नानकाला व्यापार शिकवावा या हेतूने त्यांनी नानकास वीस रुपये देऊन शेजारच्या 'चुहडकाणा' ह्या गावी पाठवले. बरोबर एक विश्वासू सेवकही दिला व नानकास म्हणाले, ''बेटा ह्या पैशातून तू चांगला 'सच्चा सौदा' करून ये.

नानक व सेवक चुहडकाणाकडे जाण्यास निघाले. गावाच्या अलिकडे एका गर्द झाडाच्या सावलीत एक साधुसंतांचा तांडा ईश्वराच्या भजनात रंगून गेलेला त्यांना दिसला. नानकाचे पाय लगेच तिकडे वळले व तोही ईश्वर भजनात रंगून गेला. पण त्याच्या लवकरच लक्षात आले की हे साधू बरेच दिवसांचे उपाशी असावेत. त्याने आपल्या सेवकाजवळ वीस रुपये देऊन त्यातून फळफळावळ व भोजनसामग्री आणण्यास सांगितले. सेवकाने आणलेली सर्व सामग्री साधुसंतांना देऊन तृप्त मनाने नानक सायंकाळी घरी परतले. नानक मोकळ्या हाताने परत आलेला पाहून काळूराम फार संतापले. नोकराने घडलेला सर्व प्रकार काळूरामांना सांगितला. नानक म्हणाले, ''बाबा तुम्हीच तर सांगितले होते की सच्चा लाभदायक सौदा करून ये. साधुसंतांना भोजन देण्याहून अधिक लाभदायक सच्चा सौदा अन्य कोणता असू शकतो ?'' यावर काळूराम निरुत्तर झाले; पण ह्या सर्व प्रकाराने ते व्यथित झाले. त्यांना काय करावे ? हे कळेना.

## सुलतानपूर पर्व

नानकाच्या या गोष्टी नानकाची थोरली बहीण बेबे नानकी व तिचा पती जयराम ह्यांच्या कानावर जात होत्या. त्यांनी नानकास आपल्याकडे सुलतानपूरला घेऊन येण्याचे ठरविले. नानकीने तसा विचार पिता काळूराम यांना बोलून दाखविला. त्यांनी पण संमती दिली. नानक बहिणीकडे सुलतानपूरला आले. जयराम हे सुलतानपूरचा नबाब दौलतखान यांच्याकडे नोकरीस होते. दौलतखानची त्यांच्यावर फार मर्जी होती. त्याचा फायदा घेऊन त्यांनी दौलतखानापाशी नानकाचा विषय काढला. नानकाला पाहून दौलतखानही प्रभावित झाला. नानकाला त्याने आपल्या धान्य कोठारावर मापाडी म्हणून नेमले. नानकही या नोकरीत रमले.

सकाळी ब्राह्म मुहूर्तावर उठावे. गावाजवळून वाहणाऱ्या 'वई' नदीत स्नान करावे. काही वेळ ईश्वर चिंतनात घालवावा. नामस्मरण करावे. भजन-कीर्तन करावे. प्रामाणिकपणे मन लावून नोकरी करावी. परत संध्याकाळी भजन-कीर्तनात रंगून जावे. अशा तऱ्हेने आनंदात दिवस चालले होते. बेबी नानकीला वाटले आपला भाऊ सुधारला, त्याला लग्नाच्या बेडीत अडकवले की तो संसारात पूर्णपणे रुळेल. मग यथावकाश सन १४८७ मध्ये नानकांचे लग्न सुलक्षणादेवींशी बटाला येथे झाले. बटाला येथील चोना कुळातील मूलचंद व चंदाराणी खत्री या दांपत्याची सुलक्षणा ही कन्या. नानक काहीसे संसारात रमले. यथासमय त्यांना इ. स. १४९४ मध्ये श्रीचंद व इ. स. १४९६ मध्ये लक्ष्मीचंद हे दोन पुत्र झाले.

विवाहानिमित्त तळवंडीहून नानकांचे अनेक मित्र बटाला येथे आले. त्यांना पुढे सुलतानपूरला जयरामांनी नोकऱ्याही मिळवून दिल्या. त्यामध्ये एक होता भाई मरदाना. तो मिराशी जातीचा मुसलमान होता. तो नानकांहून सुमारे दहा वर्षांनी मोठा होता. त्याने सहज म्हटले की, लग्नानिमित्त मला काही बक्षीस द्या. नानकांनी त्याला 'रबाब' हे तार वाद्य बक्षीस दिले. मरदानाने व त्याच्या ह्या रबाबाने नानकांना मरदानाच्या अंतापर्यंत सावलीसारखी साथ दिली.

**'तेरा, तेरा' –** नानकांचा संसार चांगला चालला होता; पण नियतीची योजना काही वेगळीच होती. नानकांच्या मनातील प्रभू परमात्म्याविषयीचा भक्तिभाव यत्किंचितही कमी झाला नव्हता. रात्रंदिवस त्यांचे ईश्वरचिंतन चालू होते. धान्याचे माप घालताना तर अनेक वेळा गडबड होई. 'तेरा' हा आकडा आला की, त्यांच्या मनात येई 'हे प्रभू! यह सबकुछ तेरा है' व ते अनेक वेळा तेरा, तेरा म्हणत माप घालत राहत. याचा लाभ घेऊन नानकांना पाण्यात पाहणाऱ्यांनी नबाबाचे कान फुंकले. अफरातफरीच्या आरोपावरून त्यांना कोठडीत कैद करून ठेवण्यात आले. पुढे चौकशी झाली. ईश्वरीकृपेने सर्व आरोप खोटे ठरले. नानकांची निर्दोष मुक्तता झाली. आज सुलतानपूरला त्या कोठडीच्या जागी 'गुरुद्वारा कोठरीसाहेब' उभा आहे. अशा रीतीने संसारी जगाच्या सुखदु:खाचा उपभोग नानक घेत होते. त्यामुळे ते हळूहळू जास्तच अंतर्मुख झाले. मनात प्रपंच की परमार्थ हे द्वंद्व सुरू झाले.

**ईश्वरी साक्षात्कार –** इ. स. १४९७ ची सुरवात होती. कोणी हा सन १४९९ असे सांगतात. नेहमीप्रमाणे नानक ब्राह्म मुहूर्तावर वई नदीवर स्नानास गेले. बरोबर एक सहकारी होता. अंगावरील कपडे उतरवून त्यांनी त्याच्या जवळ दिले व ते नदीत उतरले. बराच वेळ झाला तरी नानक वर येईनात. हे पाहून सहकारी घाबरला. त्याला वाटले की, नानक बुडाले. धावत जाऊन त्यांनी हे वृत्त बेबे नानकी व जयराम यांना सांगितले. सारा गाव वई नदीच्या तीरावर जमला. कसून शोध घेतला. पण सर्व प्रयत्न वाया गेले. सर्व लोक निराश होऊन परत गेले. चवथ्या दिवशी नानक पुन्हा प्रकट झाले. वई नदीत तीन दिवस, तीन रात्री केलेल्या तपश्चर्येअखेर त्यांना परमेश्वरी साक्षात्कार झाला व पुढील जीवनासाठी मार्गदर्शन झाले असावे असे मानण्यास हरकत नाही. त्यांना असे जाणवले की कोणी हिंदू नाही. कोणी मुसलमान नाही. सारी ईश्वराचीच लेकरे आहेत. नानकांना अनेकांनी परोपरीने विचारून पाहिले. पण त्यांनी हे सारे हसण्यावारी नेऊन उत्तर देण्याचे टाळले.

पुढे एके ठिकाणी त्यांनी त्या तीन दिवसांबद्दल खालीलप्रमाणे लिहून ठेवले आहे. 'मी सर्व काही विसरून प्रभुनामात तल्लीन होऊन गेलो होतो. देहभान विसरून गेलो होतो. परमेश्वराचे दूत येऊन मला त्याच्याकडे घेऊन गेले. प्रभू परमात्म्याने मला सन्मान वस्त्रे दिली व आपल्या हाताने मला अमृत पाजले. मला सांगितले की, ''तू आता अनासक्त होऊन नामसंकीर्तन करीत राहावेस. मी सदैव तुझ्या सोबत राहणार आहे.''

नानक हळूहळू विरक्त झाले व त्यांनी आपला निश्चय सर्वांसमोर बोलून दाखवला. सासरे मूलचंद, बहीण नानकी, मेहुणे जयराम, पत्नी सुलक्षणादेवी यांना त्यांनी सांगितले की, ''मी आता प्रपंचातून विरक्त होऊन परिक्रमेसाठी बाहेर पडावे अशी मला परमेश्वराची आज्ञा झाली आहे. मला ती मोडता येणार नाही. कृपया मला समजावून घ्या व आनंदाने निरोप द्या. मूलचंद म्हणाले की तुम्ही आता संसारी आहात. पत्नीच्या संमतीशिवाय तुम्ही संन्यास घेऊ शकत नाही. त्यावर सुलक्षणादेवींना उद्देशून नानक म्हणाले, ''तुम्ही सुज्ञ आहात. मी विरक्त होऊन लोक कल्याणार्थ परिक्रमा करणार म्हणजे 'संन्यास' घेणार असा त्याचा अर्थ मुळीच नाही. प्रभूची आज्ञा म्हणून मी परिक्रमा करणार आहे. त्याची आज्ञा होईल तेव्हा मी परत येईन. मी विरक्त झालो म्हणजे संसार सोडला असे मुळीच नाही. मी नक्की परत येईन हा विश्वास बाळगा. मला समजून घ्या. मला परवानगी द्या. नानकांचा निश्चय पाहून अखेर सर्वांनी त्यांच्या इच्छेस मान्यता दिली. एके दिवशी प्रात:काळी त्यांनी घर सोडले. त्यांच्याबरोबर त्यांचा लाडका शिष्य मरदाना व त्याचा रबाब होता.

## उदासी पर्व

श्री गुरू नानक देव यांच्या जीवनातील हा अत्यंत महत्त्वाचा व प्रदीर्घ कालखंड आहे. 'उदासी' म्हणजे सर्व संग परित्याग करून भगवी वस्त्रे धारण करून ईश्वर प्राप्तीसाठी यात्रा करत हिंडणे. श्री गुरू नानक देवांनी इ. स. १४९७ ते १५२० अशी सुमारे २४ वर्षे ह्या उदासीत खर्च केली. त्यात त्यांनी संपूर्ण भारतातच नव्हे तर भारताबाहेर श्रीलंका, तिबेट, चीनचा सिकियांग प्रांत, वर्तमान पाकिस्तान, अफगाणिस्तान, अरेबिया, तुर्कस्तान, सिरीया, लेबानन, पॅलेस्टाईन आदी देशांतही प्रवास केला. इतका विस्तृत प्रवास अन्य कोणाही भारतीय संताने केलेला नाही. ह्या उदासीबद्दल पुरातन जनमसाखी, मेहेरबान जनमसाखी, भाई बाला जनमसाखी श्री गुरू तीर्थ संगम; भाई गुरुदास दी वार आदी ग्रंथांतून बरीच माहिती उपलब्ध होते. पण दुर्दैवाने त्यात एकवाक्यता आढळत नाही. पंजाबी युनिव्हर्सिटी, पटियाला यांनी बरेच संशोधन करून श्री गुरू नानक देवांच्या उदासींचा आढावा घेऊन 'गुरू नानक देव जी दे उदासी' नावाने ह्या प्रवासांचे नकाशे प्रसिद्ध केले आहेत. ह्या सर्वांचा परामर्श घेऊन आपण श्री गुरू नानक देवांच्या उदासीबद्दल अधिक जाणून घेऊ या.

**१) पूर्व उदासी –** ह्या यात्रेत त्यांनी सुलतानापूरहून निघून पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तरांचल, उत्तर प्रदेश, बंगाल, आसाम, बांगला देश, ओरिसा एवढा प्रदीर्घ प्रवास केला.

**२) दक्षिण उदासी –** ह्या यात्रेत ते ओरिसातील जगन्नाथपुरी हून आंध्र, तामिळनाडू, श्रीलंकेपर्यंत जाऊन परतीच्या प्रवासात तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान मार्गे परत तलवंडी येथे आले.

**३) उत्तर उदासी –** यात तलवंडीहून निघून, पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, तिबेट, चीनच्या सिकियांग प्रांतातून लडाख, लेह, काश्मीर, जम्मू मार्गे परत तलवंडीस आले.

**४) पश्चिम उदासी –** तलवंडीहून निघून पाकिस्तानातील सिंध प्रांतातून जलमार्गे अरबस्तानात मक्का मदीना यात्रा करून तुर्कस्तान, सिरीया, पॅलेस्टाईन, इराक, अफगाणिस्तान मार्गे परत तलवंडीस परतले.

ह्याशिवाय त्यांनी पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश येथे छोट्या छोट्या यात्रा करून प्रामुख्याने सिद्ध योगी व सुफी संतांशी संपर्क साधला आहे. आता या सर्व प्रवासातील प्रमुख घटनांचा परामर्श आपण घेऊया.

### पूर्व उदासी

इसवीसन १४९७ मध्ये सर्वांचा निरोप घेऊन नानक व मरदाना 'बिआस' नदी ओलांडून पुढे निघाले. पुढे एका निर्जन स्थळी झाडाखाली ते विश्रांतीसाठी थांबले. तेथे भजन करता करता नानक समाधिमग्न झाले. कित्येक तास निघून गेले. इकडे मरदाना भुकेने व्याकूळ झाला. त्याने नानकांना तसे सांगितले. नानक म्हणाले, ''थोडा धीर धर, ईश्वराचे नामस्मरण कर.'' एवढे बोलून नानक परत ईश्वरभक्तीत तल्लीन झाले. थोड्या वेळाने एक श्रीमंत माणूस आपल्या लवाजम्यासह तेथे आला. नानकांचा तेज:पुंज चेहरा पाहून त्याने ओळखले की हा कोणी अलौकिक पुरुष आहे. त्याने नानकांचे पाय धरले. नानक व मरदाना यांना त्याने मिष्टान्न भोजन दिले व तो पुढे निघून गेला. नानक मरदानास म्हणाले, ''पाहा! तू भुकेमुळे काही काळ परमेश्वरास विसरलास पण तो तुला विसरला नाही. त्याने तुझी ह्या निर्जनस्थळीही भोजनाची व्यवस्था केली. अरे त्याला सर्व जीवांची काळजी असते. त्याच्यावर पूर्ण श्रद्धा ठेव. तो सदासर्वकाळ आपले रक्षण करील हा विश्वास बाळग व सदासर्वदा तन-मन:पूर्वक त्याच्या चिंतनात निमग्न होऊन राहा.''

पुढे भविष्याचा वेध घेत ते मरदानास म्हणाले, ''नीट ऐक. मला स्पष्ट दिसत आहे की ह्या निर्जन जागीच पुढे एक सुंदर नगरी वसेल व तेथे येणाऱ्या जाणाऱ्याची क्षुधाहरण होईल.'' आज त्याच ठिकाणी 'गोइंदवाल' हे शहर वसले आहे व तेथील गुरुद्वारात चोवीस तास भक्तांना प्रसाद भोजन देण्यासाठी 'लंगर'ची व्यवस्था करण्यात आली आहे.

तेथून मजल दर मजल करत नानक व मरदानाची जोडी एका विस्तीर्ण जलाशयापाशी येऊन पोहोचली. तेथील

निसर्गरम्य परिसर पाहून नानक मोहित झाले व तेथेच झोपडी बांधून काही दिवस मुक्काम केला. येथेही त्यांनी एक भविष्य वाणी केली. ते मरदानास म्हणाले, ''भविष्यात कोणी महापुरुष ह्या जलाशयाचा जीर्णोद्धार करील व ही जागा साऱ्या मानवजातीसाठी एक तीर्थक्षेत्र बनेल. तो जलाशय म्हणजेच 'अमृतसर' व शहर म्हणजे 'श्री अमृतसर' शहर.

**लालो सुतार व मलीक भागो –** नानक व मरदाना पुढे निघाले व सैदपूरला पोहोचले (आज ह्या गावास एमनाबाद असे म्हणतात.) तेथे ते लालो सुतार ह्या गरीब सुताराकडे राहिले. भाई लालो सुतार रोज कष्ट करून आपला उदरनिर्वाह करी. त्याने नानक व मरदानाचे स्वागत केले. आपल्या कष्टाच्या भाकरीतील भाकरी तो त्यांना देई. नानकही त्याच्यावर प्रसन्न होते. लालोच्या अंगणात सकाळ संध्याकाळ भजन-कीर्तन चाले. हळूहळू गावातील लोकही तेथे भजनासाठी जमू लागले. नानक त्यांना खऱ्या धर्माचा उपदेश करत. नानकांची कीर्ती सैदपूरपासून लाहोरपर्यंत पसरली पण सैदपूरच्या धर्ममार्तंडाना मात्र नानकांची ही लोकप्रियता व त्याचे हरिजनाकडे राहणे बोचू लागले. त्यांनी नानकास धर्मचर्चेचे आव्हान दिले. नानक नम्रपणे म्हणाले, ''पंडितजन हो ! अशा गोष्टीत चर्चेने काहीही साध्य होत नाही. कारण आपला अहंकार आडवा येतो असा माझा अनुभव आहे. तुमचा मार्ग वेगळा माझा मार्ग वेगळा. माझा मार्ग प्रेमाचा, ईश्वरभक्तीचा. माझ्या मार्गाने मला जाऊ द्या.'' असे म्हणून ते आपल्या भजन-कीर्तनात रंगून गेले. पंडितांनाही त्यांचा उपदेश मनोमन पटत होता पण अशी सहजासहजी हार मानणारे ते नव्हते. त्यांनी त्या भागातील नबाबाचा अधिकारी मलिक भागो याचे कान फुंकले. मलिक भागो हा एक भ्रष्ट, लाचखाऊ व क्रूरकर्मा होता. त्याने नानकास सैदपूर सोडून जाण्यास सांगितले. नानकाने उत्तर दिले, ''परमेश्वराने मला येथे आणले आहे. त्याची आज्ञा होईल तेव्हा मी येथून जाईन, पुढे भागोने त्यास आपल्या घरी भोजनास आमंत्रित केले. नानकांनी त्यास नम्रपणे नकार दिला. मग मलिक भागो स्वत: पंचपक्वांन्नाचे ताट घेऊन आला. त्याच वेळी लालो सुताराने नानकांपुढे नेहमीप्रमाणे भाकरी आणून ठेवली. नानक भाकरी खाऊ लागले. मलिक भागोस राग आला. तो म्हणाला ''माझे अन्न तुम्ही का स्वीकारत नाही ?'' नानक म्हणाले, ''लोकांवर जुलूम जबरदस्ती करणे हा धर्म नव्हे.'' भागो म्हणाला, ''माझ्यासारख्या उच्च वर्णीयाचे भोजन नाकारता व शुद्र जातीच्या सुताराचे भोजन स्वीकारता यात तरी कोणता धर्म आहे ?'' नानकानी ओळखले की आता कृती करून दाखवण्याची वेळ आली आहे. त्यांनी मलिक भागोच्या ताटातील एक घास उचलला व तो हाताने पिळला. त्यातून भळाभळा रक्त वाहू लागले. मग त्यांनी लालोच्या भाकरीचा तुकडा घेतला व तो पिळला तर त्यातून दुधाच्या धारा बरसू लागल्या. मलिक भागोस आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. तो नानकांना शरण गेला. नानकांनी त्यास उपदेश केला. ''अन्न कोणी दिले, तो कोणत्या जातीचा आहे, हे अगदी गौण आहे. ते अन्न कसे कमावले हे महत्त्वाचे आहे. कष्ट करून कमावलेले अन्न हे अमृतासमान असते. त्याने आत्म्याची उन्नती होते. उलट जुलूम, जबरदस्तीने, पापाने कमावलेल्या धनाचा उपयोग करून केलेले अन्न विषसमान असते. त्याने आत्म्याची अधोगतीच होते.'' ह्या उपदेशाने मलिक भागोचे डोळे उघडले. त्याने आपले वर्तन सुधारले. आपले धन गोरगरिबांना वाटून टाकले. तो नानकांचा शिष्य बनला व पुढे प्रचारकही बनला.

**पानिपतचा शेख शरीफ –** प्रवास करत श्री गुरू नानक देव व मरदाना पानिपत येथे पोहोचले. तेथे प्रख्यात सुफी संत, बाबा शेख शरीफ यांचा खूप बोलबाला होता. त्यांनी कठोर तपाचरण करून प्रभू परमात्मा प्राप्त करून घेतला होता. पण सिद्धी प्राप्त व्हाव्यात म्हणून ते व्याकूळ होते. श्री गुरू नानक देव यांनी त्यांच्या घराजवळच आपला मुक्काम ठोकला. तेथे ते भजन-कीर्तनात रंगून जात. हळूहळू ते लोकप्रिय होऊन गेले. शेखच्या कानावर ह्या गोष्टी गेल्या. त्याने आपला शिष्य नानकांकडे पाठवला. श्री गुरू नानक देवांचा तो विचित्र पोशाख व तेजस्वी मुखमंडल पाहून त्यास त्यांच्या अलौकिकत्वाचा साक्षात्कार झाला. त्याने शेखना सारी हकिगत सांगितली. शेखही त्यांच्या दर्शनास गेला. त्या वेळी नानक जे पद गात होते, त्याचा आशय असा होता की, ''जीव प्रभुप्राप्तीच्या मागे लागतो. त्यात तो यशस्वीही होतो. लोक त्यास मानू लागतात. मग त्या साधकास प्रसिद्धीचा लोभ सुटतो. त्यासाठी तो सिद्धीच्या मागे लागतो व दु:खी होतो. ह्या

सिद्धी जीवास प्रभूपासून दूर नेतात. म्हणून जीवाने त्यांचे मागे न लागता प्रभुपदी आपले चित्त एकाग्र करावे.'' शेखला ह्या पदातील मर्म समजले. त्याचे औदासिन्य मावळले व तो श्री गुरू नानकांना शरण गेला.

**सिकंदर लोदीचे हृदय परिवर्तन –** श्री गुरू नानक देव व मरदाना ही जोडी दिल्लीस येऊन पोहोचली. तेथे सिकंदर लोदी राज्य करत होता. तो हिंदूंवर अनन्वित अत्याचार करीत असे. साधुसंतांना, सज्जन लोकांना तुरुंगात डांबून त्यांचा शारीरिक छळ करत असे. नानक व मरदाना दिल्लीत पोहोचताच सिकंदर लोदीने त्यांना पकडून तुरुंगात डांबले. पण श्री गुरू नानक देव स्थितप्रज्ञ होते. तुरुंगातही त्यांनी आपला भजन-कीर्तनाचा कार्यक्रम चालूच ठेवला. त्यांना छळण्यासाठी त्यांना चक्की पिसण्याचे कष्टदायक काम देण्यात आले. तरी श्री नानक देवांचे भजन-कीर्तन चालूच होते. असे सांगतात की इकडे नानक भजन म्हणत असताना चक्की आपोआप सुरू होई व पीठ पडत राही. अन्य सर्व कैदी एवढेच नव्हे तर लोदीचे पाहऱ्यावर ठेवलेले सैनिकही देहभान विसरून भजनात तल्लीन होत. ही गोष्ट लोदीच्या कानावर गेली. शहानिशा करण्यासाठी तो स्वत: नानकांच्या कोठीपाशी आला. त्या वेळी नानक मरदानाच्या रबाबाच्या ध्वनीवर भजनात तल्लीन होते. ते म्हणत असलेल्या भजनाचा आशय असा होता. ''आज दैवयोगाने तुझ्या हाती सत्ता आहे. त्याचा दुरुपयोग करून तू दुसऱ्यांचे शोषण करीत आहेस. पण अशाने जनतेत तू नावडता होशील. त्यातून तुझ्या सत्तेचा डोलारा कोसळून पडेल. प्रभूने तुला ही सत्ता अशासाठी दिली आहे की तू तुझ्या रयतेला सुखी करून प्रभू परमात्म्यास प्रिय व्हावे. तुझे हे वैभव अंती तुझ्याबरोबर येणार नाही. तू केलेली सत्कृत्ये, तू घेतलेले प्रभुनामच तुला तारील.'' श्री गुरू नानक देवांची ती तेज:पुंज मूर्ती पाहून व सारे लोक, आपले शिपाईही त्यांच्या भजनात रंगून गेल्याचे पाहून सिकंदर लोदी अवाक झाला. त्याला उपरती झाली तो नानकांना शरण गेला. त्याने सर्व संतसज्जनांची सुटका केली.

**कुरुक्षेत्र –** दिल्लीहून सुटका झाल्यावर श्री गुरू नानक देव व मरदाना कुरुक्षेत्र येथे येऊन पोहोचले. तेथे त्यांनी एका सरोवराकाठी झोपडी बांधून मुक्काम केला. कुरुक्षेत्र हे भारतातील एक तीर्थक्षेत्र आहे. सूर्यग्रहणाचे दिवशी अनेक भाविक तेथे गर्दी करतात. गंगेत स्नान करतात व भटा भिक्षुकांना दानधर्म करतात. असे केल्याने सूर्याचे ग्रहण सुटते अशी त्यांची समजूत पुरोहित वर्गाने करून दिली होती. हे अज्ञान पाहून नानकांना वाईट वाटे. ते सांगत ''बाबांनो, सूर्यग्रहण ही एक नैसर्गिक घटना आहे. तुम्ही स्नान दान केल्याने ग्रहण सुटते हे केवळ अज्ञान आहे. परमेश्वर भावाचा भुकेला आहे. अनन्यभावाने त्यास शरण जा. त्याचे सदैव स्मरण करा. तो तुमचे रक्षण करील.''

**हरिद्वार –** श्री गुरू नानक देव व मरदानाची जोडी आता हरिद्वार येथे आली. हे एक हिंदूचे तीर्थक्षेत्र. येथे गंगेत उभे राहून पूर्वेकडे तोंड करून सूर्यास अर्घ्य दिल्यास पितरांना ते पोहोचते व त्यांचा उद्धार होतो. अशी त्यांची समजून. नानकांनी एक गंमत केली. ते त्या समुदायाबरोबर गंगेत उभे राहून पश्चिमेकडे तोंड करून अर्घ्य देऊ लागले. आजूबाजूचे लोक म्हणू लागले, ''अरे वेड्या पूर्वेकडे तोंड करून अर्घ्य दे. त्या शिवाय ते तुझ्या पितरांना कसे पोहोचणार?'' नानक म्हणाले, ''माझा मळा पश्चिमेला आहे. तुमचा अर्घ्य जर स्वर्गात पितरांना पोहोचतो. तर माझे पाणी माझ्या मळ्यापर्यंत का पोहचू नये?'' नानक पुढे सांगत, ''हे सारे अज्ञान आहे. ह्या भ्रांत रूढी सोडा. प्रभुनामाचे भक्तिभावाने स्मरण करा. आपले मन ह्या गंगेप्रमाणे शुद्ध करा. विकारांचा त्याग करा व त्या प्रभू परमात्म्यास शरण जा.''

**गोरखमता –** हरिद्वारहून निघून नानक व मरदाना ही जोडी हिमालयाच्या कुशीत वसलेल्या 'गोरखमता' ह्या ठिकाणी आली. हे नाथपंथी योग्यांचे फार मोठे स्थान होते. अनेक नाथपंथी योगी तेथे योग साधना करत. त्यांच्या सभा भरत. नानक त्यांच्या सभेत जाऊन पोहोचले. नानकांना पाहून योग्यांचा प्रमुख नानकास म्हणाला, ''बाळा तू कोण? ह्या मार्गाकडे कसा वळलास. तुझा गुरू कोण? वगैरे'' नानक म्हणाले, ''या देहास नानक म्हणतात. प्रभू परमात्म्यानेच मला इकडे आणले. तो सांगेल तेव्हा मी येथून तो नेईल तिकडे जाईन.'' पुढे नानक व योगी यांच्यात बरीच चर्चा झाली. या चर्चेत योग्यांनी नानकास योगमार्गाची महती पटवून देण्याचा प्रयत्न केला तर नानकांनी योग्यांना सांगितले, की प्रभुप्राप्तीसाठी

रानावनात जाण्याची गरज नाही, शरीरास कष्ट देण्याची गरज नाही, संसाराचा त्याग करण्याचीही आवश्यकता नाही. तो प्रभू परमात्मा सदैव आपल्या जवळच आहे. भक्तिभावाने, अनन्य श्रद्धेने त्याचे स्मरण केल्याने संसारात राहूनही तो प्राप्त होतो. ह्या सर्व चर्चेचा व अन्य ठिकाणी योग्यांशी झालेल्या चर्चेचा वृत्तान्त श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये ' सिध गोसटी ह्या शीर्षकाखाली पान क्र. ९३८ ते ९४६ वर अंकित केला गेला आहे.

**अयोध्या –** श्री नानक देव व मरदाना प्रवास करत करत अयोध्यानगरीत येऊन पोहोचले. लहानपणापासून नानकांच्या मनावर रामनामाचे संस्कार झाले होते. त्यांची माता रामभक्त होती. त्यामुळे नानकांच्या अंगी उपजतच रामभक्ती होती. सर्वत्र रममाण असलेला राम हे त्यांचे दैवत होते. ते लोकांना हेच सांगत की राम मूर्तीत नाही. तो तर सर्व चराचरसृष्टीत भरून राहिला आहे. त्याचे हे सर्वव्यापी स्वरूप जाणा व त्याची उपासना करा.

**श्री क्षेत्र काशी –** आता श्री नानक देव व मरदाना काशीक्षेत्री येऊन पोहोचले. कैलासपती श्री शंकर व अन्य देवदेवतांचे दर्शन करून ते एके ठिकाणी विसावले. तेथे त्यांची पंडित चतुरदास यांच्याशी भेट झाली. पंडित चतुरदास नानकांना म्हणाले, ''आपण तर सत्पुरुष दिसता. पण आपणाजवळ शाळिग्राम कसा नाही ? गळ्यात तुळशीमाळही नाही हे कसे ? त्यावर श्री गुरू नानक उत्तरले,'' हे पंडित ! गळ्यात तुळशीमाळ घालणे, जवळ शाळिग्राम बळगणे. हे सारे बाह्य अवडंबर आहे. खरा शाळिग्राम तो प्रभू परमात्मा तुझ्या हृदयातच वसत आहे. त्याला जाण. सत्कर्म रूपी तुळशीमाळ धारण कर. स्नानादी कर्मकांडाने तू तुझे हे मृण्मय शरीर स्वच्छ करतोस. पण मनाचे काय ? ते कसे शुद्ध करणार ? टिळा, माळा करून तू प्रभुभक्तीचा केवळ देखावा करत आहेस. हे सारे व्यर्थ आहे. तू प्रभुसेवारूपी रहाटाने प्रभुनामरूपी अमृतजल काढ. त्या नामरूपी जलाने आपले मन शुद्ध कर. हे खरे स्नान आहे. त्यानेच तू प्रभुकृपा प्राप्त करू शकशील. मनातील काम, क्रोध आदी विकार निखंदून टाकून प्रभूस अनन्यभावाने शरण जाणारा खलपुरुषही प्रभुकृपेने संतत्वास पोहोचतो.

**श्री क्षेत्र गया –** काशीहून नानक व मरदाना गया येथे येऊन पोहोचले. गया क्षेत्री पिंडदान केल्यास ते आपल्या पूर्वजास स्वर्गात पोहोचते, अशी लोकांची समजूत. पंडेलोक सांगत की, ''तुम्ही मला अन्नदान, वस्त्रदान, सुवर्णदान द्या. मी ते तुमच्या पितरांना स्वर्गात पोचवतो.'' नानकांना हसू आले. ते पंड्याला म्हणाले, ''काय रे, तुझ्याजवळ माझ्या पूर्वजांचा परलोकातील पत्ता आहे काय ? मरण्यापूर्वी ते तुला देऊन गेले होते का ? अरे, तुला माझे नाव पत्ताही ठाऊक नाही, तर माझ्या पितरांचा तरी कसा ठाऊक असणार ? ही सारी ढोंगबाजी आहे. तू साध्या भोळ्या लोकांना फसवून त्यांना लुबाडत आहेस.''

नानकांनी लोकांना श्राद्ध कर्मातील, पिंडदानातील फोलपणा समजावून देण्याचा प्रयत्न केला. ते सांगत की, ''लोक हो, परलोकात इहलोकातील कोणतीही वस्तू पोहचू शकत नाही. तेथे फक्त तुम्ही इहलोकी केलेली कर्मे येतात व तुम्ही केलेल्या सत्कर्म वा दुष्कर्म यांची फळे तुम्हास भोगावी लागतात. म्हणून ह्या कर्मकांडाच्या मागे न लागता तुमच्या ह्या जन्मात सत्कर्मे करा. तीच तुमच्याबरोबर येतील. प्रभूस शरण जा. सदैव त्याचे नामस्मरण करा. तेच तुम्हाला इहलोकी व परलोकी तारील.''

**पटणा –** गयेहून श्री गुरू नानक देव व मरदाना पटणा येथे गेले. तेथे मरदानास अशी इच्छा झाली की बाजारात जावे. काही खरेदी करावी. तो म्हणाला, ''गुरुदेव, बाजारात जावे, काही खरेदी करावी म्हणतो, काही पैसे देता ?'' नानक म्हणाले, ''तू तर जाणतोस मी एक नि:संग फकीर आहे. माझ्या जवळ तुला देण्यासाठी एक फुटकी कवडीही नाही. हो पण हा एक 'खडा' आहे. तो विकून तुला काही खरेदी करता आली तर पहा. मरदाना तो खडा घेऊन बाजारात गेला. एका फळाच्या दुकानात जाऊन त्याने 'खडा' दिला व फळे मागितली. फळेवाला म्हणाला, ''बाबारे, हा खडा माझ्या काय उपयोगाचा ? तो तू एखाद्या सराफाकडे घेऊन जा. तुला हवी तर दोन-चार फळे घेऊन जा.'' मरदाना सालस राय जव्हेरी यांच्या पेढीवर गेला. तो खडा त्याने जव्हेरीस दिला व ह्याची किंमत करून मला रक्कम अदा करा असे म्हणाला. जव्हेरीने

तो खडा न्याहाळला व तो आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला, ''हे भल्या गृहस्था. हा एक अनमोल हिरा आहे. ह्याचे मोल करणे ही अशक्य गोष्ट आहे. पण तू मला ह्या अनमोल रत्नाचे दर्शन घडविलेस म्हणून मी तुला शंभर रुपये बक्षीस देतो. हे रत्न तू तुझ्या मालकास परत दे.'' मरदाना परत आला. त्याच्या पाठीमागे तो जव्हेरीही गुपचूप तेथे येऊन पोहोचला. श्री गुरू नानक देव समाधि मग्न होते. त्यांचे ते दिव्य रूप पाहून जव्हेऱ्याने मनोमन ओळखले की हा कोणीतरी सिद्ध पुरुष, देव पुरुष आहे. मरदानाने गुरुजींना सारी हकिगत सांगितली. नानक म्हणाले, ''जा असाच परत जा. आपणास फुकटचे काही नको. हे द्रव्य आपणास काय कामाचे ? आपले द्रव्य आहे 'हरिनाम' हे द्रव्यच अंतीही आपल्या कामी येणार आहे.'' जव्हेरी हे सर्व ऐकत होता. इतका नि:संग पुरुष तो प्रथमच पाहत होता. त्याने श्री गुरू नानक देवांचे पाय धरले व तो त्यांचा शिष्य झाला.

**असम प्रांत –** श्री गुरू नानक देव व मरदाना ही जोडी पटण्याहून पूर्वेकडे असम प्रांतात जाऊन पोहोचली. त्या प्रदेशास त्यावेळी कामरूप म्हणत असत. तेथे कामाख्या देवीचे मंदिर आहे. कामदेवाचे ते राज्य. मंत्र-तंत्र विद्येचे ते माहेरघर समजले जात असे. असम प्रांतातील स्त्रिया ह्या मंत्र तंत्र विद्येत प्रवीण समजल्या जात. त्या पुरुषाना मंत्राने भारून त्यास बकरा बनवीत अशी आख्यायिका आहे. एका स्त्रीने असेच मरदानास बकरा बनवून त्यास घेऊन गेली. नानकदेवांनी, अंतर्ज्ञानाने हे जाणले व ते तिच्या घरी गेले. त्यांनी तिला परोपरीने उपदेश करून हा वाईट मार्ग सोडण्यास सांगितले पण तिने त्यास मुळीच दाद दिली नाही. उलट तिने नानकांच्या वरच आपल्या जादूचा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला. पण नानकांवर त्याचा काहीही प्रभाव पडत नाही. हे पाहिल्यावर तिने जाणले की हा कोणी महा अवलिया आहे. ती श्री गुरू नानक देवांना शरण गेली व तिने मरदानास मुक्त केले. नानक तिला म्हणाले, ''प्रभू परमात्म्याने आपणास जी शक्ती दिली आहे तिचा असा दुरुपयोग करू नये. त्या प्रभू परमात्म्यास शरण जाऊन त्याचे नित्य स्मरण करावे. आपल्या शक्तीचा, संपत्तीचा सत्कार्यार्थ उपयोग करावा.'' तिने पुढे हा उपदेश शिरोधार्य मानून आपले उर्वरित आयुष्य सत्कारणी लावले.

असम प्रांत हा डोंगर, नद्या व जंगलांनी व्यापलेला आहे. त्याच्या उंचसखलपणामुळेच त्यास 'असम' असे नाव पडले आहे. तेथे कायम वादळे, महापूर व भूकंप अशासारखे निसर्ग-प्रकोप होत असतात. तेथील लोकांना हे नित्य परिचयाचे असते पण मरदानास मात्र हे माहीतही नव्हते.

असममध्ये अशाच निर्जन अरण्यातून प्रवास करत असताना एकाएकी प्रचंड वादळ सुरू झाले. धुवाधार पाऊस बरसू लागला. भरीत भर म्हणून धरणीकंपही झाला. मोठमोठ वृक्ष उन्मळून पडले. नानक मरदानांचा मार्गही अडला. मरदाना खूप घाबरला. जणू महाप्रलयच झाला असे त्यास वाटू लागले. पण नानक मात्र शांत होते. ते प्रभुनामात तल्लीन होते. इकडे मरदानाची मात्र भीतीने बोबडी वळली. आपण आता येथेच मरणार असे वाटून मरदाना गर्भगळीत झाला. तो गुरू नानक देवांना म्हणाला ''बहुदा येथेच मरणार. आपल्या कलेवरांना अग्नी देण्यास कोणी मनुष्यही उरणार नाही'' नानकांनी त्यास धीर दिला. हा एक निसर्गप्रकोप आहे. प्रलय खूप दूर आहे, घाबरू नकोस. परमात्म्यावर विश्वास ठेव व स्वस्थ राहा असे सांगितले. अखेर वादळ शमले व ह्या गुरू शिष्यांचा प्रवास पुढे सुरू झाला.

त्या काळात असम प्रांतात श्री शंकरदेव महापुरुष हे थोर धर्मात्मा कार्यरत होते. त्यांच्या व श्री गुरू नानक देवांच्या विचारात विलक्षण साम्य आहे. दोघांनाही मूर्ति पूजा मान्य नव्हती. उच्चनीच भेद मान्य नव्हते. शंकरदेव महापुरुषांच्या पंथास 'नाम धर्म' किंवा 'एक शरणीय पंथ' असे म्हणतात. श्री शंकरदेव महापुरुषांनी गावोगाव नाम घरे स्थापिली. त्यामध्ये कोणतीही मूर्ती नसते तर श्री शंकर देव लिखित 'नाम घोष' हा ग्रंथ ठेवलेला असतो. त्यातील पदांचे भजन-कीर्तन चालू असते. एकमेव प्रभुनाम हाच जीवनाचा एकमात्र आधार आहे, असे ते सांगत. श्री गुरू नानक देव व श्री शंकर देव महापुरुष यांचा विचारातील हे साम्य थक्क करणारे आहे. त्यावरून श्री गुरू नानक देवांच्या असम यात्रेत ह्या दोन महामानवांची भेट झाली असावी असे मानण्यास जागा आहे. शीख गुरुद्वारातही असेच दृश्य आपणास दिसते. असम

प्रांतातून श्री नानक देव व मरदाना ढाक्का येथे आले व तेथून जगन्नाथ पुरीस आले.

**जगन्नाथ पुरी –** ओरिसा प्रांतातील जगन्नाथ पुरी हे एक महत्त्वाचे हिंदू तीर्थक्षेत्र आहे तेथे प्रतिवर्षी जगन्नाथाची यात्रा भरते. नानक देव जगन्नाथाच्या मंदिरात गेले. वेळ सायंकाळची होती. सूर्य मावळत होता मंदिरात जगन्नाथाची आरती चालू होती नानकांचे लक्ष मात्र बाहेरच्या संध्यासमयीच्या निसर्गदृश्याने मोहून गेले होते. त्यांची भावसमाधी लागली व त्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

**गगने मे थालु रवि चंदु दीपक बने ताडिका मंडल जनक मोती .....**

सदर आरती श्री गुरू ग्रंथ साहिब पान क्र. १३ वर अंकित आहे. ती सोहिला ह्या रचनेत समाविष्ट केलेली आहे.

''आकाशरूपी तबकात चंद्र व सूर्य हे दोन दिवे तेवत आहेत. अगणित तारेरूपी मोती पसरले आहेत.'' हे काव्य मोठे प्रत्ययकारी आहे. जणू निसर्गदेवता निराकार प्रभू परमात्म्याची आरती करत आहे असा साक्षात्कार हे पद ऐकणाऱ्यास होतो.

जगन्नाथ पुरीमधील अन्य महत्त्वाची घटना म्हणजे वैष्णवपंथी महान संत चैतन्य महाप्रभू व श्री गुरू नानक देव यांची भेट ! पुरातन जनम साखी व मेहेरबान साखी यात त्याचे विस्तृत वर्णन आले आहे. त्यानुसार ह्या दोघा महामानवांच्या जगन्नाथ पुरीमध्ये अनेक वेळा भेटी झाल्या. एवढेच नव्हे तर त्यांनी अनेक वेळा एकत्र कीर्तनही केले असे दिसून येते.

काही जनमसाख्यांवरून असे दिसते की जगन्नाथ पुरीहून श्री गुरू नानकदेव सुलतानपुरास व मरदाना तलवंडीस परत आले. तर काहीच्या मते ते जगन्नाथपुरीहून पुढे तसेच दक्षिणेकडे गेले. ह्या वादात न पडता आपण त्यांच्या दक्षिण यात्रेचा आढावा घेऊ.

## दक्षिण उदासी

जगन्नाथ पुरीहून आपला मुक्काम हलवून ते कटकला आले. तेथून गुंटरमार्गे कांचीपुरमला पोहोचले. श्री गुरू नानक देव गुंटूरला आले होते ह्याचा पुरावा म्हणून तत्कालीन गुरुद्वारा दाखवला जातो. कांचीपुरम हे विजयानगर साम्राज्यात होते. ते हिंदूंचे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. तेथील शिवाचे व विष्णूचे मंदिर प्रसिद्ध आहे. ते तिरुवन्नमलाई येथे पोहोचले. येथेही पुरातन गुरू द्वारा आहे. तेथून ते तिरुचिरापल्ली येथे गेले. श्रीरंगाचे दर्शन घेतले. हे स्थान श्री रामानुजाचार्यांची कर्मभूमी आहे. तेथून कावेरी नदीतून जलमार्गाने ते नागपट्टणम येथे येऊन पोहोचले. नागापट्टणम हे त्या काळचे प्रसिद्ध बंदर होते. तेथून समुद्र मार्गे त्रिकोमाली ह्या श्रीलंकेच्या बंदरात जाऊन पोहोचले. तेथून ते बट्टीकोलाइ येथे पोहेचले. हा भाग त्या वेळी तामिळी हिंदूंच्याच ताब्यात होता व तेथे शिवभान हा राजा राज्य करत होता असे बालाजी जनमसाखीवरून दिसते. बट्टीकोलापासून १२ कि. मी. वर असलेल्या कुरूकल मंडप ह्या गावी श्री नानक देव व मरदाना ह्यांचा काही काळ मुक्काम होता. त्याचा पुरावा म्हणून एक शिलालेख दाखवतात. तेथून ते श्रीलंकेच्या दक्षिण पूर्व टोकावर असलेल्या सीतावाक ह्या क्षेत्री पोहोचले. ह्या ठिकाणी अशोक वनात सीता बंदीवास भोगत होती असे सांगितले जाते. तेथून ते अनुराधापूर येथे गेले. त्या वेळी अनुराधापूर ही सिलोनची (श्रीलंका) राजधानी होती. तेथून ते मनार येथे आले व समुद्रमार्गे रामेश्वर येथे आले. रामेश्वर येथे पुरातन गुरु द्वारा आहे. त्यास 'नानक उदासी मठ गुरुद्वारा' असे म्हणतात. ह्यावरून असे दिसते की सर्व प्रवासात ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी आपल्या सत्यधर्माचा प्रचार केला व तेथे त्यांना अनुयायीही मिळाले.

रामेश्वराहून रामनाथपुरम, पालन, कोट्टायममार्गे त्रिवेंद्रम येथे पोहोचले. तेथून उत्तरेकडे वळून निलगिरी पर्वत रांगांतून पुढे बीदरला पोहोचले. त्यावेळी तेथे बहामनी राज्य होते. तेथून ते मराठवाड्यात नांदेड मुक्कामी येऊन पोहोचले. त्या ठिकाणी ते जेथे वास्तव्यास होते तेथे एक जुने गुरु द्वारा आहे. त्यास 'गुरुद्वारा मालटेकडी' असे नाव आहे. पुढे दहावे गुरू श्री गुरू गोबिंद सिंघांनीही ह्या नानक स्पर्शाने पावन झालेल्या नांदेडनगरीत वास्तव्य केले. आज ते सीख बांधवांचे मोठे

तीर्थक्षेत्र बनले आहे. तेथून ते विदर्भातून गुजरातमधील भडोच येथे पोहोचले. त्यांचे वास्तव्य जेथे होते तेथे आता 'नानकवाडी गुरुद्वारा' उभे आहे. भडोचहून समुद्रमार्गे ते 'प्रभास पट्टणम क्षेत्री आले व तेथून सोमनाथ, तसेच द्वारका क्षेत्री गेल्याचे ही सांगितले जाते. तेथून ते उज्जैन येथे गेले. तेथून ते ओंकारेश्वर येथे गेले. तेथे त्यांनी ओंकाराच्या निर्गुण निराकार-रूपाचे, चैतन्य रूपाचे वर्णन करून सांगितले. तसेच मुलांना मुळाक्षराबरोबरच प्रत्येक अक्षराचे आध्यात्मिक स्वरूप सांगा असा सल्ला अध्यापकांना दिला. ह्या प्रसंगी त्यांना स्फुरलेले हे काव्य श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये पृष्ठ क्र. ९२९ ते ९४६ वर अंकित केले आहे. सदर वाणीचे नाव 'ओअंकार' असे असून ते दखणी रामकली रागात निबद्ध केले आहे.

श्री गुरू नानक देव उज्जैनहून पुढे श्रीकृष्णाची लीलाभूमी मथुरा येथे येऊन पोहोचले. येथे राधा व कृष्ण यांची आराधना केली जाते. अनेक हिंदी संतकवींनी जीवास स्त्री मानले आहे व प्रभू परमात्म्यास पुरुष मानले आहे. जीवाचे शिवाशी मिलन हा त्यांचा रचनांचा केंद्रबिंदू आहे. श्री गुरू नानक देव व अन्य गुरूंनीही हा भाव आपल्या पदातून प्रगट केला आहे. मथुरेहून नानक तलवंडीस परतत असताना वाटेत सिरसा येथे थांबले. तेथे त्यांची एका सुफी फकिराशी चर्चा झाली, ती जागा 'चिल्ला बाबा नानक' म्हणून प्रसिद्ध आहे. सिरसाच्या फकिरीचे नेते होते अहमद शकूर. ते नानकांना म्हणाले, ''ईश्वरप्राप्तीसाठी ऊग्र तपश्चर्या आवश्यक आहे. शारीरिक क्लेश भोगल्यानेच आत्मशुद्धी होते व मुक्ती प्राप्त होते.'' नानक म्हणाले, ''परमेश्वरप्राप्तीसाठी शरीराला कष्ट देण्याची मुळीच आवश्यकता नाही. आपण मनोभावे परमेश्वराची भक्ती केली, संसारात राहूनही संसारापासून अलिप्त राहून मन ईश्वरचिंतनात एकाग्र केले तर ईश्वर प्राप्त होतो. सुफी संत चाळीस दिवसांचे 'चिल्ला' व्रत करतात. ह्या चाळीस दिवसांत ते कडकडीत उपवास करतात. नानकांनीही त्यांच्याबरोबर हे व्रत केले. व्रता अखेर सुफी संत गलितगात्र होऊन गेले. पण नानक मात्र पहिल्यासारखे हसतमुख व प्रसन्नचित्त होते कारण ते सर्वकाळ ईश्वरचिंतनात निमग्न होते त्यामुळे ते स्वस्थ चित्त होते. त्यांचे हे अद्‌भुत सामर्थ्य पाहून सुफी संत अहमद शकूर नानकांना शरण आले. म्हणून ह्या ठिकाणास 'चिल्ला बाबा नानक' असे म्हटले जाते.

सिरसाहून नानक मजल दरमजल करीत पाकपट्टण येथे पोहोचले. तेथील सुफी संत शेख फरीद नानकांचा शिष्य बनला होता. त्याची भेट घेऊन सुलतानपूरमार्गे तलवंडीस पोहोचले.

## उत्तर उदासी

ह्या उदासीत नानक उत्तर दिशेस गेले. तलवंडीहून निघून मजल दरमजल करत बीआस नदी ओलांडून सुलतानपूर येथे पोहोचले. जालंदर, हिस्सारपूर मार्गे सतलज नदी पार करून पीर बुधन शहाच्या मुक्कामावर पोहोचले. तेथे ते ज्या ठिकाणी थांबले होते तेथे सहावे गुरू हरगोविंद यांनी कीरतपूर हे गाव वसवले. तेथे 'चरण कवल गुरुद्वारा'आहे. श्री गुरू 'नानक देवांच्या चरणकमलाच्या स्पर्शाने पुनीत झाले आहे असे स्थान' असा त्याचा अर्थ आहे. तेथून ते मंडी येथे पोहोचले तेथे स्कंध धारेची एक डोह आहे त्यास 'खलसर' किंवा खल सरोवर म्हणतात. तेथून ते 'ज्वालातीर्थ' येथे पोहोचले, तेथे भूगर्भातून वर आलेली एक ज्योत अखंड तेवत आहे. त्यामुळे त्यास 'ज्वालातीर्थ' असे म्हणतात. निसर्गाचा हा चमत्कार पाहून त्यापुढे विनम्र होऊन श्री गुरू नानकदेवजी 'कीरग्राम' ह्या गावी पोहोचले. ह्याच गावास आता 'वैद्यनाथ' असे म्हणतात तेथे 'कीर' ह्या वन्य जमातीचे वास्तव्य होते. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करून त्यांना उपदेश करून ते पुढे 'मनीकरन' ह्या गावी पोहोचले. ह्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष होते. श्री गुरुनानक देवांना लोकांचे हाल पाहवेनात. त्यांनी आपल्या दैवी सामर्थ्याने तेथे गरम पाण्याचे झरे उत्पन्न केले असे सांगितले जाते. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ तेथे एक पुरातन गुरुद्वारा आजही उभे आहे. तेथून ते चंद्रकला खिंडीतून 'मुलाना' ह्या गावी पोहोचले. तेथील त्यांच्या वास्तव्याबद्दल अनेक लोककथा आजही त्या भागात प्रचलित आहेत. तेथून ते स्पिती नदीच्या काठाने प्रवास करत पश्चिम तिबेटमध्ये पोहोचले व तेथून ते मान सरोवराच्या दिशेने पुढे गेले. पुढे कैलास पर्वताचे (त्या काळी त्यास सुमेरू पर्वत असे म्हटले जात

असे) दर्शन करून ते पुढे उत्तर दिशेने निघाले. कैलास पर्वताच्या आजूबाजूच्या मंदिरात नानक देवांच्या अनेक मूर्तीही आढळल्या आहेत. तेथून गंगटोक, रुडोक मार्गे चुसुल खिंडीतून ते लडाखमध्ये येऊन पोहोचले. 'कारूनागार' येथे त्यांचे काही काळ वास्तव्य झाले. त्या भागातील लोकांची त्यांच्यावर एवढी भक्ती जडली की त्या गावाच्या आसपास अनेक गावात श्री गुरू नानक देवांची मंदिरे बांधली गेली. त्या काळात श्री गुरू नानक देवांचा मुक्काम 'हेमस गुंफा' येथे होता. तेथील एका प्रस्तरावर बसून ते भजन-कीर्तन करीत असे सांगतात. तेथून ते लेहमार्गे 'बोसगो' ह्या गावी आले. त्या ठिकाणी एक विलक्षण प्रकार घडला. श्री गुरू नानकांवर एका नरमांसभक्षक राक्षसाने हल्ला चढवला, पण श्रीगुरू नानक देवांनी आपल्या अंगीच्या अद्‌भुत सामर्थ्याने त्याचे पाषाणत रूपांतर केले. आजही तो महाकाय दगड तेथे दाखवला जातो व अनेक श्रद्धाळू शीख त्या शिळेचे श्रद्धापूर्वक दर्शन घेतात. तेथून ते स्कार्डूमार्गे कारगिलला पोहोचले. स्कार्डूला एक पुरातन गुरुद्वारा आहे. कारगिलहून ते द्रास, झोजीला मार्गे अमरनाथ येथे येऊन पोहोचले व अमरनाथ येथील शिवलिंगाचे दर्शन घेऊन पेहेलगाम मार्गे 'मटान' येथे आले. तेथे पूर्वी मार्तंड मंदिर होते. आज त्याचे भग्नावशेष पाहावयास मिळतात. हे स्थान अनंत नागच्या अत्यंत नजीक आहे. तेथील एका टेकडीवर श्री गुरू नानक देव मुक्कामास थांबले. त्यांच्या आधीच त्यांची कीर्ती तेथे येऊन पोहोचली होती. अनेक लोक तेथे त्यांच्या दर्शनार्थ येऊ लागले व श्री गुरू नानक देवांच्या उपदेशाने तृप्त होऊन परतू लागले. श्री गुरू नानक देवांची कीर्ती प्रसिद्ध काश्मिरी पंडित ब्रह्मदास यांच्याही कानी गेली. त्यांच्या मनात श्री गुरू नानकांना पाहण्याची इच्छा झाली पण अहंकार आड येऊ लागला. त्यांनी आपला शिष्य कमाल यास श्री गुरू नानक देवांकडे जाण्यास व एकंदर परिस्थितीचे निरीक्षण करण्यास पाठवले. हा कमाल परमेश्वरी कृपेसाठी आसुसलेला होता. नाना मार्ग चोखाळूनही त्यास प्रभू परमात्मा प्राप्त झाला नव्हता. तो त्या टेकडीवर श्री गुरू नानक देवांच्या दर्शनासाठी गेला. गुरुदेवांचे तेजस्वी मुखमंडळ व आश्वासक मुद्रा पाहून त्याच्या सर्व शंका नष्ट झाल्या. ज्या सतगुरूची आपण वाट पाहत होतो तो हाच अशी त्याची मनोमन खात्री पटली. श्री गुरुदेवांच्या अमृतमधुर वाणीने तो तृप्त झाला व तो त्यांच्या चरणी लीन झाला.

कमालने हा सारा वृत्तान्त पं. ब्रह्मदासांना कथन केला. अखेर ब्रह्मदासही आपला अहंकार विसरून श्री गुरू नानक देवांच्या भेटीस गेले. त्यांना आलेले पाहून श्री गुरू नानक देवांनी पुढे होऊन विनम्रभावे अभिवादन करून म्हटले, ''पंडितजी आपण फार श्रेष्ठ आहात. मी एक सामान्य माणूस आहे. आपण येण्याचे कष्ट घेण्याऐवजी मला निरोप पाठवला असतात तर मी आपल्या सेवेस हजर झालो असतो.'' ह्या विनयशील उदगारानेच नानकांनी ब्रह्मदासांचे हृदय जिंकले. पुढे दोघांच्यात प्रदीर्घ संवाद झाला. त्या वेळी श्री गुरू नानकदेवांचा पोशाख अत्यंत विचित्र होता. त्यांनी सारे अंग चामड्याच्या कपड्यांनी झाकले होते. डोक्यावरही चामड्याचीच टोपी होती. नाही म्हणायला कपाळावर असलेला केशरी टीळा हीच त्यांची हिंदू साधू असण्याची खूण होती. त्यांच्या ह्या पोशाखावर टीका करून पं. ब्रह्मदास म्हणाले, ''हिंदू साधू चामड्याचा पोशाख निषिद्ध मानतात. आम्ही असे ऐकले आहे की तुम्ही मांसाहारही करता. काय हा भ्रष्टाचार!'' नानक शांतपणे म्हणाले, ''पंडितजी, वेश, टिळा, माळा, ही सारी बाह्य लक्षणे आहेत. पोशाखही बाह्य वातावरणावर अवलंबून असतो. अंत:करण शुद्ध असेल तर तुम्ही पोशाख काय करता हे दुय्यम आहे. तीच गोष्ट आहाराची. कोणत्याही गोष्टीची आसक्ती नसावी. आसक्तीने माणूस मोहमायेच्या जाळ्यात अडकून पडतो व प्रभू परमात्म्यापासून दूर जातो. अनासक्त होऊन मिळेल ते खाऊन असलेल्या परिस्थितीत आनंद मानून सदैव ईश्वर चिंतनात मग्न राहावे हाच खरा धर्म आहे असे मी मानतो'' नानकांचे बोल ऐकून पं. ब्रह्मदास अंतर्मुख झाले. नानकांचे म्हणणे त्यांना पटू लागले. नानक पुढे सांगू लागले ''तुम्ही ज्ञानी लोक खूप वाचता. खूप तर्क लढवता. त्यामुळे तुमचे हृदय तर्ककर्कश व कठोर बनते. परमेश्वर भावाचा भुकेला आहे. परमतत्त्व तर सर्वव्याप्त आहे. त्यामुळे जेथे पाहावे तेथे प्रभू परमात्मा विराजमान आहे हे समजले की सारे भेद दूर होतात. मनुष्य सर्वांवर प्रेम करू लागतो. मी तर सर्वांवर प्रेम करतो. प्रत्येक जीवाचे ठायी शिव आहे, म्हणून जीव सेवा हीच शिव

सेवा असे मी मानतो. सारेकाही तो प्रभू परमात्माच करतो हे जाणून रात्रंदिवस त्याचे स्मरण करावे, हाच धर्म व हाच मुक्तीचा मार्ग असे मी मानतो'' श्री गुरू नानक देवांचे हे बोल ऐकू पं. ब्रह्मदास विस्मित झाले. व ते श्री गुरू नानक देवांचे शिष्य झाले. पुढे श्री नानक देव तलवंडीस परतले.

## पश्चिम उदासी

काही दिवस तलवंडीस राहून श्री गुरू नानक देव व मरदाना फिरून एकदा यात्रेसाठी बाहेर पडले. पश्चिमेकडील मुस्लिम देशांची यात्रा करावी असे त्यांनी ठरवले, कारण गेली सुमारे ५०० वर्षे तिकडूनच भारतावर आक्रमणे होत होती. श्री गुरू नानक देव व मरदाना तलवंडीहून निघून सुलतानपूरला आले. तेथे बहीण बेबे नानकी व श्री जयरामजींना भेटून ते तुलंभ्यास पोहोचले.

**तुलंभ्याचा सजन शेख –** नानक व मरदाना पुढे मुलतानच्या दिशेने निघाले. वाटेत तुलंभा गाव लागले. तेथे सजन शेख नावाच ठग राहत असे. त्याची मोठी हवेली होती. गोड गोड बोलून प्रवाशांना आपल्या हवेलीत आणावे. रात्री झोपेत त्यांचा गळा आवळून खून करावा व त्यांना लुबाडावे हा त्यांचा धंदा. शेखच्या नोकरांनी नानक व मरदाना यांना गावात शिरताना पाहिले. त्यांना वाटले हे कोणी श्रीमंत मालदार व्यापारी आहेत. त्यांनी सजन शेखला निरोप दिला. शेखने त्यांचे स्वागत केले व म्हणाला, हिंदू लोक मला 'सज्जनमल्ल' म्हणतात तर मुसलमान मला 'सजन शेख' म्हणतात. पण मला आपल्या सारख्यांची सेवा करण्यातच आनंद वाटतो. असे म्हणून तो त्यांना आपल्या हवेलीत घेऊन आला व रात्र होण्याची वाट पाहत राहिला. रात्र झाली. नानक व मरदाना परमेश्वराचे भजनात रंगून गेले. सजन शेख चोरपावलांनी नानकाच्या खोलीपाशी आला. खोलीतील दृश्य पाहून तो अवाक झाला. नानक व मरदाना भजनात तल्लीन होऊन गेले होते. खोली दिव्यप्रकाशाने उजळून गेली होती. नानक गात होते- ''अरे मित्रा, तू लोकांना लुबाडून वाडे बांधतोस पण अखेर हे तुझ्याबरोबर येणार नाही. त्याची अखेर मातीच होईल. ज्या देहाचा तू अभिमान बाळगतोस तो देहही अखेर मातीच होणार आहे. तुझ्याबरोबर फक्त तू केलेला चांगली-वाईट कर्मेच येणार आहेत. तुला प्रभू दरबारी त्याचा हिशोब द्यावा लागणार आहे. तेव्हा तू काय सांगशील ? अजून वेळ गेली नाही. पापाचा भार वाढवण्याऐवजी प्रभुनाम कीर्तनात रंगून जा. प्रभूचे नामच तुला भवसागर तारून नेईल.'' हे बोल ऐकून सजन शेखचे हृदय परिवर्तन झाले. तो नानकांना शरण गेला. ते त्याला म्हणाले, ''तुला जर खरोखर पश्चात्ताप झाला असेल तर तुझी सारी संपत्ती तू गोरगरिबांना वाटून टाक. नि:संग होऊन कष्टाची भाकरी कमव व भगवत् भक्तीत रंगून जा'' सजन शेखने तसे केले. तो खरोखरच 'सज्जन' झाला. पुढे तो नानक पंथाचा प्रचारकही झाला.

**दुसरा शेख फरीद –** तुलंभ्याहून नानक व मरदाना हे दोघे पाकपट्टण (पवित्र भूमी) ह्या गावी येऊन पोहोचले. तेथे एक शेख इब्राहीम नावाच सुफी संत राहत होता. तो स्वत:स दुसरा शेख फरीद म्हणवत असे. (पहिला शेख फरीद तेराव्या शतकात होऊन गेला.) त्याने घोर तपश्चर्या करून अनेक सिद्धी प्राप्त केल्या होत्या. अनेक योगसाधनामुळे त्याचे शरीर कृश झाले होते. तो कायम जवळच्या जंगलातच राहून तपश्चर्या करत असे. नानक पाकपट्टणला आले तेव्हाही तो जंगलातच होता. नानक तेथे जाऊन त्यास भेटले. तो नानकाना म्हणाला, ''तुमचा पोशाख तर फकिराचा वाटतो. पण तुम्ही तर वागण्यावरून संसारी वाटता. तुम्ही देह झिजवून काहीच तपश्चर्या केलेली दिसत नाही. तप:साधनेशिवाय भवसागर कसा पार करणार ?'' नानक म्हणाले, ''संसारात राहूनही ईश्वरभक्तीने संसार तरून जाता येतो. तप:साधना ही एक नाव तर ईश्वरभक्ती, नामभक्ती ही दुसरी. नाव कोणती हे महत्त्वाचे नाही. लवकर कोण पोहोचतो ते महत्त्वाचे'' नानक पुढे म्हणाले, ''शरीर व आत्मा हे दोन्ही महत्त्वाचे. आत्म्याच्या उन्नतीसाठी शरीर हे साधन आहे. ह्या शरीरास त्रास देणे म्हणजे आत्म्यास त्रास देणेच होय. माझ्या मते ईश्वराशी एकरूप होण्यासाठी शरीराला पीडा देण्याची मुळीच आवश्यकता नाही. संसारात

राहूनही मोहमायेपासून विरक्त होऊन सतत ईश्वराशी अनुसंधान जोडून राहिल्यास, त्याच्या भक्तीत, संकीर्तनात बुडून राहिल्यास परमेश्वर प्राप्त होतो. मोहमायेपासून पळून रानावनात जाण्यापेक्षा मोहमायेच्या आहारी न जाता तिलाच दासी करून प्राप्त झालेल्या सत्तासंपत्तीचा विनियोग लोक कल्याणार्थ करणे ही ईश्वरसेवाच होय. माणसाने आत्म्याशी प्रामाणिक असावे, नामभक्तीच्या साहाय्याने ईश्वराशी नाते जोडावे. साऱ्या सृष्टीत भरून राहिलेल्या परमेश्वराची अनुभूती घ्यावी हाच खरा धर्म होय.''

शेख फरीदला नानकांचा उपदेश पटला व तो पाकपट्टणला परत येऊन लोकसेवेत निमग्न झाला.

**कुष्ठरोग्याचा उद्धार –** पाकपट्टणहून श्री गुरू नानक देव व मरदाना पुढे निघाले. चालता चालता वाटेत संध्याकाळ झाली. अंधार पडू लागला. रात्रीसाठी ते आधार शोधू लागले. जवळच त्यांना एक झोपडी दिसली. त्यांनी झोपडीचे दारावर आवाज दिला. त्या झोपडीत एक कुष्ठरोगी राहत होता. गावानेच काय त्याच्या नातेवाइकांनीही त्यास वाळीत टाकले होते. तो अत्यंत दु:खी होता. आवाज ऐकून तो चपापला. त्याने झोपडीचे दार उघडले. बाहेर दोन निरोगी माणसे पाहून तो चकित झाला. नानक देव नम्र स्वरात बोलले, ''हे प्रभो ! आजची रात्र आम्हास तुझ्या झोपडीत आश्रय मिळेल का ?'' तो कुष्ठरोगी म्हणाला, ''तुम्ही नवखे दिसता. मी एक महारोगी आहे. लोक माझी सावलीही टाळतात. त्यातून माझी झोपडीही इतकी लहान आहे की त्यात दोन माणसास जागा कशी होणार ?'' नानक म्हणाले, 'ठीक आहे, आम्ही बाहेर अंगणात झोपतो.' त्यांनी आपल्या चटया अंथरल्या व ते भजनात रंगून गेले. ते स्वर्गीय स्वर ऐकून तो कुष्ठरोगी आनंदित झाला. त्याने इतका उत्कट स्वर पूर्वी कधीही ऐकला नव्हता. तो हळूच बाहेर आला व श्री गुरू नानक देवांच्या सन्मुख गुडघे टेकून बसला. श्री गुरू नानक देव प्रभूस आळवून जणू त्यास विनवीत होते, ''हे प्रभो! ह्या भोळ्या जीवाने अजून किती रे यातना भोगाव्या ? त्याच्यावर दया कर. त्याचा उद्धार कर '' प्रार्थना ऐकून कुष्ठरोग्यास गहिवरून आले. तो श्री गुरू नानकांच्या पायावर डोके टेकून हमसून हुमसून रडू लागला. नानकांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला व म्हणाले, 'बेटा, आता विलाप पुरे. उठ!' तो कुष्ठरोगी उठला व आश्चर्याने आपल्या हातापायाकडे पाहू लागला. त्याचा कुष्ठरोग पूर्णपणे नष्ट होऊन तो पूर्ण निरोगी झाला होता. श्री गुरू नानक देव त्यास म्हणाले, ''ज्या प्रभूने तुला बरे केले त्यास विसरू नकोस. उत्कट भावाने एकाग्रचित्ताने त्याची भक्ती कर. ज्या लोकांनी तुझा संसर्ग टाळला तेच तुझ्या पाया पडतील. तुझ्या वरदहस्ताची कामना करतील.''

**पीर हमजा गौस –** श्री गुरू नानक देव व मरदाना पुढे निघाले व सिआलकोट येथे पोहोचले. सिआलकोट गावात हमजा गौस नावाचा सुफी संत राहत असे. त्याने घोर तपश्चर्या करून अनेक सिद्धी प्राप्त केल्या होत्या. तो वारंवार चाळीस दिवस एकांतवासात बसून उपवास करून तप:साधना करत असे. पण तो अत्यंत तापट होता. अनेक लोक त्याच्याकडे येऊन त्याची मनधरणी करून आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी साकडे घालत. त्याच गावात एक श्रीमंत खत्री राहत होता. त्यास मूलबाळ नव्हते. त्याने नवस केला की मला पुत्र झाल्यास मी तो हमजा गौस यास अर्पण करीन. ईश्वरी कृपेने त्यास तीन मुलगे झाले तो नवस फेडण्यासाठी हमजा गौसकडे गेला. त्याने आपल्या थोरल्या पुत्रास त्याच्या चरणावर ठेवले व म्हणाला, ''पीर साहेब, माझ्या नवसाप्रमाणे मी तुम्हास हा माझा मुलगा अर्पण करत आहे त्याचा स्वीकार करा व तुमचा प्रसाद म्हणून तो तुम्ही मला परत करा. त्याबदली मी तुम्हास भारंभार सोने देतो '' पण गौसने ते मानले नाही. तो म्हणाला आता हा मुलगा माझा आहे. मी माझा मुलगा विकणार नाही. माझ्याजवळ धनदौलत रगड आहे. त्याची लालूच तू मला दाखवू नकोस. गोष्ट हमरीतुमरीवर आली. खत्री आपला मुलगा घेऊन जाऊ लागला. हमजा गौस क्रोधाविष्ट झाला. तो म्हणाला, ''ठीक आहे ! आता पाहाच माझी करामत ! मी आता 'चालीसा' व्रत करतो व ज्या शहरात असे लबाड लोक राहतात ते शहरच भस्मसात करतो '' तो तरातरा आपल्या मठीत गेला व त्याने दार आतून लावून घेतले.

शहरात ही बातमी पोहोचताच लोक भयभीत झाले. श्री गुरू नानक देवांनाही हे वृत्त समजले. ते हमजा गौसच्या

मठीपाशी पोहोचले व मठीकडे तोंड करून ध्यानस्थ बसले. शहरातील सर्व लोकही जमा झाले. सगळीकडे भयाण शांतता पसरली. आता पुढे काय होणार ते लोक उत्सुकतेने पाहू लागले. होता होता मध्यान्ह झाली आणि एकाएकी प्रचंड आवाज होऊन मठी दुभंगली. प्राणभयाने हमजा गौस भयभीत होऊन मठीच्या बाहेर आला. समोर पाहतो तो समोर एक सत्पुरुष शांतपणे समाधी लावून बसला होता. श्री गुरू नानक देवांच्या मुखावरील दैवी तेज पाहून त्याने जाणले, की हा परमेश्वरी अवतार आहे. तो श्री गुरू नानक देवांच्या पाया पडला. नानक देवांनी त्यास उठवून आशीर्वाद दिला व सांगितले, ''हे सत् पुरुषा, अल्लाने प्रसन्न होऊन तुला काही शक्ती दिल्या आहेत. त्या लोकांचे भले करण्याकरिता. त्यांचा नाश करण्यासाठी नाही. तुझी सत्कृत्येच अखेर कयामतच्या दिवशी तुझ्या उपयोगी पडतील. आयुष्यातील प्रत्येक क्षण ईश्वराच्या उपासनेत व लोकांचे भले करण्यासाठी उपयोगी आण.'' हमजा गौसला पश्चात्ताप झाला. त्याने आपला क्रोधी स्वभाव टाकून दिला व तो खऱ्या अर्थाने पीर झाला.

**कोट्यधीश दुनीचंद –** प्रवास करत करत श्री गुरू नानकदेव लाहोरला पोहोचले. तेथे एक दुनीचंद नावाचा कोट्यधीश राहत होता. त्याच्या घरी त्याच्या वडिलांचे श्राद्ध होते. त्याने गावातील सर्व ब्राह्मणांना त्यासाठी आपल्या घरी बोलावले होते. श्री गुरू नानक देव गावात आले आहेत हे कळल्यावर त्याने त्यांनाही आमंत्रित केले. नानक व मरदानाची जोडी तेथे जाऊन पोहोचली. तेथे पाहातात तो सर्व ब्राह्मण भोजनावर यथेच्छ ताव मारत होते. शेठजीने त्यांना खूप मोठे द्रव्यही दक्षिणा म्हणून दिले होते. श्री गुरू नानक देवांनी त्यास विचारले, ''शेठजी, हे सर्व काय चालले आहे?'' शेठ म्हणाले, ''आज माझ्या वडिलांचे श्राद्ध आहे. ह्या ब्राह्मणांना दिलेले हे सारे अन्न, वस्त्र, द्रव्य स्वर्गातील माझ्या पितरांना पोहोचेल असे मला त्यांनी सांगितले आहे.'' नानक हसले व त्यास म्हणाले, ''अरे, किती रे वेडा तू! तुझ्या वडिलांनी देह ठेवल्यावर ते पुढील जन्मात बकरी बनले आहेत व बिचारे अन्नाच्या शोधात वणवण भटकत आहेत. तू समक्ष जाऊन पाहून ये. रावी नदीच्या काठी मोठ्या वडाच्या झाडाजवळ ते तुला दिसतील.'' दुनीचंद लगबगीने तेथे गेला व त्यास खरोखरच एक बकरी दिसली, ती दुनीचंदाला म्हणाली, ''मी माझ्या मानवजन्मात लोकांना लुबाडून कोट्यधीश झालो. त्याची शिक्षा म्हणून मी बेबे करत अन्नाच्या शोधात वणवण फिरत आहे. तू तर माझ्याहून अधिक जुलूम करून गरिबांना पिळून नवकोट नारायण झालास, आज तू ब्राह्मणांना दिलेस त्यातील कणभरही मला मिळाले नाही.'' दुनीचंद नानकांना शरण गेला व म्हणाला, ''मला ह्यातून मार्ग दाखवा.'' नानक म्हणाले, ''अरे, आयुष्यात केलेल्या भल्या बुऱ्या कृत्यांचा हिशोब जीवास मरणोपरांत द्यावाच लागतो. तू अन्यायाने जमवलेली ही सारी संपत्ती गोरगरिबांना वाटून टाक. कष्टाची कमाई कर. मिळालेले वाटून खा. ईश्वरास शरण जा.'' दुनीचंदाने त्या प्रमाणे केले व तो पापमुक्त झाला.

**मुलतान –** श्री गुरू नानकदेव व मरदाना प्रवास करत मुलतान येथे पोहोचले. तेथे त्यांची भेट सुऱ्हावर्दी शाखेचे सुफिसंत बहाउद्दिन यांच्याशी झाली. दोघांमध्ये प्रदीर्घ धर्मचर्चा झाली. तेथून पुढे ते देवघर येथे पोहोचले. त्यास मुस्लिम आक्रमणानंतर 'उच' म्हणू लागले. तेथे त्यांची सुफी संत शेख हाजी अबदुल्ला बुखारी यांच्याशी भेट झाली व धर्मचर्चा झाली. तेथून सक्कर मार्गे ते लखपतला पोहोचले. तेथून ते कुरीआनी गावी पोहोचले. तेथे पुराणकालीन कोटेश्वर व नारायण स्वामी यांची मंदिरे आहेत. ते हिंदूचे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. ह्या दोन्ही देवस्थानांचे दर्शन करून तेथे ते एका सरोवरा काठी थांबले. ते सरोवर नंतर 'नानक सरोवर' म्हणून ओळखले जाऊ लागले. तेथून ते हिंगलजला गेले. तेथे एक कालिमातेचे मंदिर आहे. हिंदू तिची कालिमाता म्हणून पूजा करतात तर मुसलमान 'नानी देवी' म्हणून तिची उपासना करतात. तेथे एक धर्मशाळा आहे. ती नानक धर्मशाळा म्हणून ओळखली जाते. तेथून श्रीगुरु नानक देव व मरदाना मिआनी बंदरात येऊन पोहोचले. हे बंदर हिंगलज जवळच असून अर्वाचीन कराची बंदराच्या आसपास असावे. तेथून ते अन्य मुस्लिम यात्रेकरूं बरोबर जलमार्गाने मक्केकडे निघाले. त्या वेळी त्यांचा पोशाख मुस्लिम फकिरासारखा होता. बोट अरबी समुद्रातून कलपत, एडनमार्गे अल आसवान बंदरात आली. तेथून ते मक्केस पोहोचले. त्यांचा मक्केत बरेच दिवस मुक्काम होता. त्यांच्या

मक्केतील मुक्कामाचे समग्र वर्णन 'मक्केदी गोसटि' ह्या उपलब्ध हस्तलिखितात सापडते. त्यातील काही गोष्टी आपण जाणून घेऊ या.

**काबाकडे पाय –** नानक मक्केस पोहोचले. ते दमून भागून पडले होते. त्यांचे पाय 'काबामशिदी'कडे होते. असे करणे मुसलमान लोक निषिद्ध समजतात. त्यांचे हे कृत्य पाहून एका हाजीने त्यांना लाथ मारून त्याचा जाब विचारला. तो म्हणाला, ''अरे, ती देवाची दिशा आहे. एवढी साधी गोष्ट ही तुला माहीत नाही काय?'' नानक नम्रतेने म्हणाले. ''हाजी मला क्षमा कर. मी फार दमलो आहे. पाय हलवण्याचे सामर्थ्यही माझ्या अंगी नाही. कृपया अल्ला नाही अशा दिशेस माझे पाय ठेव. हाजीने नानकांचे पाय दुसऱ्या दिशेस ठेवले आणि चमत्कार झाला. काबाची मशीदही पायाच्या दिशेस फिरली. हाजी जिकडे म्हणून पाय फिरवी तिकडे काबाची मशीद फिरे. हाजीला नानकांची महती कळून चुकली. तो त्यांना शरण आला. (अशीच गोष्ट संत नामदेवांच्या चरित्रात ही वाचावयास मिळते.)

**मक्केतील दिवस**

वरील चमत्कारामुळे दिवसेंदिवस नानक मक्केतील जनतेत लोकप्रिय होऊ लागले. त्यांच्या भजन-कीर्तनाला, प्रवचनांना गर्दी होऊ लागली. ते सांगत ''सारी अल्लाचीच लेकरे आहेत. त्यात कोणताही भेद नाही. सारे त्याला सारखेच. एकाग्रचित्ताने त्यास आळवल्यास तो प्रसन्न होतो. हीच खरी नमाज. प्रत्येकाच्या त्याने केलेल्या चांगल्या-वाईट कृत्याचा हिशोब कयामतच्या वेळी केला जातो. तरी लोक हो ! सत्कृत्ये करा. अन्य जीवांस मदत करा.'' मक्केतील लोकांची त्यांच्यावर खूपच श्रद्धा जडली. ते त्यांना मक्केतच राहण्याचा आग्रह करू लागले. शेवटी आपल्या खडावा आपली स्मृती म्हणून तेथे ठेवून ते मदीनेस गेले. मदीना शहरातील महमंद पैगंबरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या स्थानांचे दर्शन घेऊन ते पुढे तुर्कस्तान, सिरीया, पॅलेस्टाइनमार्गे बगदाद शहरी पोहेचले.

**बगदादेतील दिवस**

त्या काळी बगदाद हे एक नावाजलेले ठिकाण होते. ते मुस्लिम धर्माच्या अभ्यासाचे मुख्य ठिकाण होते. नानकानी गावाबाहेर दफनभूमीजवळ आपला मुक्काम ठोकला. संध्याकाळ झाली. नमाजाची वेळ झाली. नानक उभे राहिले. कानावर पाची बोटे ठेवून खड्या आवाजात पण सुस्वर स्वरात त्यांनी बांग दिली. इतकी आर्त स्वरातील बांग बगदादच्या लोकांनी कधीच ऐकली नव्हती. ते संमोहित झाल्याप्रमाणे नानकांच्या दिशेने धावत सुटले. नानकांनी प्रार्थना सुरू केली. त्याचा आशय असा 'साऱ्या सृष्टीचा मालक तो एकमेव अल्लाह आहे. हे मालिक ! मी तुझा बंदा आहे. माझी प्रार्थना ऐक. लोकहो, नीट ध्यानात घ्या की ही दुनिया नाशवंत आहे. इझराइलने, मृत्यूच्या दूताने केस पकडले आहेत. तो जेव्हा जीवाला ओढून नेईल, तेव्हा कोणीही बरोबर येणार नाही. सगळे मृताला गाडून निघून जातील. हे मालिक ! साऱ्या आयुष्यभर मी लालसेत लिप्त होऊन राहिलो. मला तुझी कधी आठवणही आली नाही. जन्मभर मी चुकाच करत राहिलो. हे अल्लाह ! तू बडा आहेस. तू दयाळू आहेस. साऱ्यांचा पालनकर्ता आहेस. ह्या नानकावर कृपा कर व त्याला तुझ्या सेवकांची चरणधूळ दे.'' लोक ही प्रार्थना ऐकून नानकांचे चरणी लीन झाले. ही वार्ता बगदादच्या मुख्य पीराच्या कानी गेली. त्याने नानकास घेऊन येण्यासाठी आपले सेवक पाठवले. पीराच्या सेवकांनी नानकाने सांगितले, की पीरसाहेबांनी तुम्हास बोलावले आहे. पीरसाहेबांच्या हुकमावरून आम्ही तुम्हास नेण्यास आलो आहोत. नानक म्हणाले, ''मी अल्लाहचा बंदा आहे. त्यानेच मला येथे पाठवले आहे. मी केवळ त्याच्याच आज्ञा पाळतो. अन्य कोणाच्या नाही.'' एवढे सांगून ते परत भजनात तल्लीन झाले. अखेर नानकाच्या भेटीस पीरसाहेब स्वत: आले. ते नानकांना म्हणाले, ''आपले नाव काय? आपण कोणत्या पंथाचे फकीर आहात?'' नानक म्हणाले, ''ह्या देहास लोक नानक म्हणतात. मी त्या एकमेव अल्लाहचा फकीर आहे.'' पीर म्हणाला, ''तरीपण तुमचा देश, पंथ, घराणे असेलच ना?'' नानक हसले व म्हणाले, ''अल्लाहला कोणता एक देश असतो का? घराणे असते का? पंथ असतो का? तो तर सर्वव्याप्त आहे. सारीच त्याची लेकरे आहेत. तो

सर्वांची काळजी वाहतो. त्याच्या घरी कोणताही पंथ नाही. घराणे नाही. देश नाही. आम्ही माणसांनीच ह्या सुंदर वसुंधरेचे देश, प्रदेश असे वाटप केले. माणसा-माणसात भेद निर्माण करून पंथ निर्माण करून आपण आपसात भांडत बसतो.'' पीराला हे सारे पटत होते. पण तो हार मानावयास तयार नव्हता. अखेर तो म्हणाला, ''तुम्ही तर म्हणता अनंत आकाश, अनंत पाताळ आहेत. कुराणात तर फक्त सात आकाश व सात पाताळ सांगितले आहेत. आपण तर कुराणाच्या विरुद्ध सांगता हे कसे? तुम्ही अनंत आकाश, अनंत पाताळ दाखवू शकता?'' पीराचा मुलगा जवळच बसला होता. श्री गुरू नानक देवांनी त्यास जवळ बोलावले. त्यास डोळे मिटावयास सांगितले व त्याच्या मस्तकावर हात ठेवला. लगेच तो समाधी अवस्थेत गेला व आपण अनंत अंतराळात प्रवास करत आहोत, त्यात अनंत आकाश, अनंत पाताळ, अनंत विश्वे आहेत असा त्यास साक्षात्कार झाला. नानकाने त्याच्या मस्तकावरील हात काढून घेतला. हळूहळू तो भानावर आला. त्याने झाला प्रकार सर्व लोकांना कथन केला. सर्वांची खात्री पटली की, नानक सामान्य मनुष्य नसून खरोखरीच ईश्वराचा प्रेषित आहे. सारे जण त्यांच्या पुढे नतमस्तक झाले. ह्या गोष्टीच्या स्मरणार्थ त्या जागी तुर्कीभाषेत लिहिलेली स्मृतिशिला सापडली आहे.

बगदादहून नानक तेहरानमार्गे कंदाहारहून काबूलला आले. काबूल ही त्यावेळी बाबराची राजधानी होती. नानक तेथे बरेच दिवस थांबले. तेथे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक पुरातन गुरुद्वाराही होता. पुढे त्याचा विध्वंस करण्यात आला. पूर्वी बाबराने वायव्य सरहद्द प्रांतावर अनेक वेळा आक्रमणे केली. पण त्यास सतत पराभव पत्करावा लागला होता. पण तो भारतावर आक्रमणाची तयारी करत होता, हे श्री गुरू नानक देवांनी आपल्या काबूलच्या मुक्कामात पाहिले होते. सन १५०१ मध्ये श्री गुरू नानक देव आपल्या शिष्यांना म्हणाले होते की, हे मोगल अत्यंत खुनशी आहेत. ते परत भारतावर आक्रमण करतील व मृत्यूचे तांडव होईल. रक्ताच्या नद्या वाहतील. मांसाचा चिखल सर्वत्र पसरेल. काबूलमधील वास्तव्यात त्यांना बाबराच्या ह्या आक्रमणाची चाहूल लागली असावी. ते लगबगीने हिंदुस्थानात परत यावयास निघाले. खैबर खिंडीतून ते पेशावरला आले. तेथून ते गोरखहाट येथे आले. तेथे सिद्ध योग्यांशी चर्चा करून तेथून ते हसन अबदल ह्या गावी आले. येथे वली कंधारी नावाचा सुफी फकीर राहत असे. तो अत्यंत क्रोधी होता. तो ज्या डोंगराच्या माथ्यावर राहत होता त्याच्या तळाशीच श्री गुरू नानक देव उतरले होते. त्यांची कीर्ती वाढत होती. लोक त्यांच्या भजन-कीर्तनात रंगून जात. वलीस हे आवडले नाही. त्याने लोकांना नानकाकडे जाऊ नका असे सांगितले. पण लोक मात्र नानकाकडे जातच राहिले. वली राहत असे तेथून एक झरा वहात होता. त्यावर साऱ्या गावाचे जीवन अवलंबून होते. वलीने आपल्या योग सामर्थ्याने तो झराच अटवून टाकला. लोक हवाल दिल झाले. ते वलीच्या पाया पडले. पण वलीस दया आली नाही. तो म्हणाला, ''जा तुमच्या नानकाकडे व मागा त्याला पाणी.'' लोक नानकाकडे आले व त्यांनी झाला प्रकार नानकांना कथन केला. नानकांनी मरदानास वली कंधारीकडे पाठवले व त्यास पाणी न अडविण्याची विनंती केली. पण वलीने मरदानाचा अपमान करून त्यास हाकलून लावले. झाला प्रकार मरदानाने श्री गुरूनानक देवांना सांगितला. नानक शांतपणे उठले. डोंगर चढू लागले. निम्मा अर्धा डोंगर चढल्यावर ते एका ठिकाणी थांबले व तेथे लोकांना खणावयास सांगितले. लोक खणू लागले. थोडे खणताच फार मोठा झरा वेगाने उसळून बाहेर आला. लोकांना पाणी मिळाले, जीवन मिळाले. आता तर लोक पूर्णपणे नानकाच्या भोवती गोळा झाले. वलीचा क्रोध आणखीनच वाढला. नानकांना मारून टाकावे म्हणून त्याने एक मोठी शिळा नानकाच्या दिशेने ढकलून दिली. ती प्रचंड शिळा गडगडत नानकांच्या दिशेने येऊ लागली. लोक भयभीत झाले. पण नानक मात्र शांत होते. शिळा नानकांच्या अगदी जवळ येऊन पोहोचली. नानकांनी हात वर केला व आपल्या हाताच्या पंजाने त्या शिळेस थांबण्याची आज्ञा केली. धर्मगुरू नानक देवांच्या पंजाचा स्पर्श होताच ती शिळा तेथेच थांबली. आजही त्या शिळेवर श्री गुरू नानक देवांच्या पंजाचा ठसा उमटलेला दिसतो. आज तेथे 'गुरुद्वारा पंजासाहिब' आहे व ते शिखांचे पवित्र तीर्थस्थान आहे.

**आला, आला, बाबर आला –** श्री गुरू नानक देव व मरदाना हसन अबदलवरून सैदपूरला येऊन पोहोचले व

मागोमाग ज्याची त्यांनी आधीच भविष्यवाणी केली होती तेच घडून आले. बाबर हिंदुस्थानवर चालून आला. नव्हे नव्हे प्रत्यक्ष मृत्यूच नंगानाच करीत चालून आला. लुटालूट, जाळपोळ करीत, मंदिरे तोडीत, ग्रंथ जाळीत, स्त्रियांवर बलात्कार व पुरुषांची कत्तल करीत बाबर सैदपूरला आला. तेथेही हेच घडले. रक्ताचे पाट वाहिले. मांसाचा चिखल तुडवीत बाबराचा नंगानाच सुरू झाला. ह्या साऱ्याचे प्रत्ययकारी वर्णन श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये आले आहे. ते वाचताना अंगावर काटा येतो. डोके बधिर होते. नानक म्हणतात -

**खुरासान सखमाना कीआ हिंदुसतानु डराइआ ।।**
**आपै दोसु न देई करता जमु करि मुगलु चडाइआ ।।**
**एती मार पई करलाणे तै की दरदु न आइआ ।।१ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ३६०)

हे प्रभो ! तू खुरसान निवासी बाबराच्या रूपाने येऊन साऱ्या हिंदुस्थानला भयभीत केले आहेस. बाबराच्या रूपाने जणू यमासच येथे पाठवले आहेस. हे प्रभो ! जनतेवर इतके अनन्वित अत्याचार झाले, सर्वत्र दु:खाचे चित्कार उठले तरीही तुला तिळमात्रही व्यथा कशी झाली नाही ?

**जैसी मै आवै खसम की बाणी तै सड़ा करी गिआनु वे लालो ।।**
**पाप की जंत्रले काबलहु धाइआ जोरी मंगै दानु वे लालो ।।**
**सरमु धरमु दुइ छपि खलोए कुडु फिरै परधानु वे लालो ।।**
**काजीआ बामणा की गल थकी अगदु पड़े सैतानु वे लालो ।।**
**खून के सोहिले गावीअहि नानक रतुका कुंगू पाइ वे लालो ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ७२२)

हे लालो ! मला प्रभू परमात्म्याकडून जसे कळले आहे तसे मी तुला सांगतो. काबूलहून आलेली बाबराची फौज म्हणजे पाप व अत्याचाराचीच जणू वरात आली आहे व ते हिंदुस्थानरूपी कन्येस बळजबरीने आपल्या ताब्यात घेत आहेत. सैदपुरातून लज्जा व धर्म लुप्त झाले आहेत. सर्वत्र असत्य आपले वर्चस्व गाजवत आहे. सैतान बळजबरीने हिंदुस्थानरूपी कन्येशी विवाह करत आहे. ब्राह्मण व काजी हताशपणे हे पाहत आहेत. उच्च-नीच जातीतील स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. सर्वत्र आक्रोश व विलापाचेच सूर ऐकू येत आहेत. कुंकुमतिलकाच्या ऐवजी सर्वत्र रक्ताचे सडे शिंपले जात आहेत.

बाबराच्या अत्याचारातून श्री गुरू नानक देव व मरदानाही सुटले नाहीत. त्यांनाही बंदी बनवण्यात आले. एकट्या सैदपूरमध्येच ३०,००० स्त्री-पुरुषांना बंदी बनवल्याचे फारशी इतिहासकार सांगतात. त्या वेळी प्रत्याक्रमण करण्यासाठी ज्यांच्याकडे पाहावे असे कोणी उरले नाही. हा सारा कलियुगाचा प्रभाव आहे. जे प्रभू परमात्म्याच्या मनात आहे तेच होणार, असे विचार नानकांच्या मनात आले. ते अधिक अंतर्मुख झाले. जे नशिबी असेल ते भोगावयास सिद्ध होणे हे जाणून त्यांनी आपल्या मनाची समजून घातली. श्री गुरू नानक देव व मरदाना यांना ओझी वाहण्याचे काम देण्यात आले. मुखाने प्रभूचे नाम घेत त्यांनी हे काम केले. श्री गुरू नानक देव व मरदाना सकाळ-संध्याकाळ ईश्वराच्या भजन चिंतनात निमग्न असत. त्यांचा तो आर्त भक्तिभाव स्वर ऐकून इतर लोकही त्यात सामील होऊ लागले. एवढेच नव्हे तर बाबराचे सैनिकही त्यात सामील झाले. एक अनोखे वातावरण निर्माण झाले. एका कवितेत म्हटले आहे. **''योजिली अम्हास्तव त्याने जरी बंदीशाळा।। भासवू तया हे गोकुळ हे नव्हे बंदीशाळा।।''** प्रभूच्या सेवकांनी प्रभुभक्तीने बंदीशाळेचे गोकुळ बनवून टाकले होते.

बाबराचा सरदार मीरखानही हे दृश्य पाहून चक्रावून गेला. त्याने श्री गुरू नानक देवांचे दर्शन घेतले. अशा पवित्र

आत्म्यास आपण उगाचच छळत आहोत अशी त्यास उपरती झाली. त्याने बाबराच्या कानावर ही गोष्ट पोहोचवली. खातर जमा करण्याकरता बाबर स्वत: तेथे आला. दुरूनच त्याच्या कानावर प्रभू परमात्म्याची स्तुती करणारे भजन पडले. भजनाच्या त्या सुमधुर व भक्तिरसपूर्ण स्वरांनी त्यासही मोहित केले. तो बंदीशाळेत आला. नानक व सर्व बंदीजन भजनात रंगून गेले होते. त्याने श्री गुरू नानक देवांच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्याभोवती एक दिव्यवलय पसरले होते. बाबरास त्यांच्या ठिकाणी प्रत्यक्ष अल्लाच दिसू लागला. तो श्री गुरू नानक देवांच्या चरणी लीन झाला व म्हणाला, ''हे गुरुदेव मी आपला महिमा जाणला नाही. आपणास खूप दु:ख दिले. मला क्षमा करा. प्रायश्चित म्हणून मी आपणास काय देऊ?'' नानक म्हणाले, ''मला काही नको. मला देणारा तो अल्ला आहे. तुला खरेच पश्चात्ताप झाला असेल तर ह्या सर्व कैद्यांना सोडून दे. त्यांचे हरण केलेले द्रव्य त्यांना परत दे. असे केल्याने तू केलेल्या पापाचे अंशत: परिमार्जन होईल.'' बाबराने तसे हुकूम सोडले. सर्व कैदी मुक्त झाले. थोडे फार द्रव्यही प्रत्येकास मिळाले. बाबर पुढे दिल्लीच्या दिशेने निघाला.

श्री गुरू नानक देव आता विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या कामात मग्न झाले. सैदपूरवासीयांचे जीवन काहीसे मूळपदावर आल्यावर श्री गुरू नानक देव कर्तारपूरकडे वळले.

## करतारपूर पर्व

सैदपूरहून श्री गुरू नानक देवजी करतारपूरला आले. मागे श्री गुरू नानक देवजी दुसऱ्या उदासीच्या अखेरीस लाहोरला गेले असता त्यांचा शिष्य खत्री करोडी याने आपल्या मालकीचा, रावीनदीच्या तीरावरील एक विशाल भूखंड श्री गुरू नानक देवांच्या चरणी समर्पित केला होता. प्रभू परमात्म्याचीच तशी काही योजना असेल असे मानून त्यांनी त्याचा स्वीकार केला होता. तिसऱ्या उदासीस निघण्यापूर्वी तेथे एक धर्मशाळा बांधून वाटसरूंची सोय केली होती. मरदानास तेथे ठेवून व त्यास योग्य त्या सूचना देऊन ते पुढे उत्तरेच्या यात्रेस निघाले.

उत्तरयात्रा पूर्ण करून श्री गुरू नानक देव परत आले. तोपर्यंत मरदानाने त्या भूमीचे रूप पार पालटून टाकले होते. एका मराठी कवीने म्हटले आहे.

**योजिली अम्हास्तव त्याने जरी माळ जागा।**
**कसु कंबरा फुलवाया तिथे रम्य बागा॥**
**उभे राहु आम्ही अमुच्या जरी परीत्राणा।**
**काय होइ विन्मुख कैचा तरी देवराणा॥**

खरोखरच देवाने तेथे येऊन वास करावा असेच सारे होते. श्री गुरू नानक देव प्रसन्न झाले. त्यांनी त्या गावाचे नाव ठेवले 'करतारपूर.' करतार म्हणजे प्रभू परमात्मा. प्रभू परमेश्वराचा जेथे वास आहे ते ठिकाण. म्हणून 'करतारपूर' म्हणजेच 'देवभूमी.' किती सार्थ नाव!

पुढे चौथ्या उदासीनंतर परत येताना श्री गुरू नानक देव तलवंडी व सुलतानपूरला गेले. आपले माता, पिता, पत्नी, दोन पुत्र सर्वांना घेऊन ते करतारपूरला आले.

येथून पुढे त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या पण महत्त्वाच्या पर्वास सुरुवात झाली. आदर्श गृहस्थाश्रम कसा असावा. सुखी मानवी जीवन म्हणजे काय याचा करतारपूर पर्व हा वस्तुपाठच होता. येथे कोणीही लहान नाही. कोणीही महान नाही. कोणीही सेवक नाही, सेवा करून घेणारा नाही. कोणीही राजा नाही. कोणीही प्रजा नाही. सारे समान सारे एक, महाभारतात आदर्श मानवी जीवनाची संकल्पना अशी सांगितली आहे, की

**न तत्र राज राजेंद्र। न दण्डो नच दण्डीका:।**
**स्वधर्मेणैव धर्मंच ते रक्षंती परस्परम्॥**

(महाभारत भीष्म पर्व १२/३६)

करतारपूरमधील जीवन म्हणजे ह्या उक्तीचा चालता-बोलता आदर्श होता.

सर्वजण प्रात:काली लवकर उठत. प्रात:कर्म उरकून प्रहरभर भजन-कीर्तन चाले. नंतर सर्वजण आपापल्या विहित कार्यात निमग्न होत. कोणी शेतात काम करी, कोणी सरपण गोळा करी. कोणी स्वयंपाक-पाणी बघे. सारे जणू एकाच कुटुंबाचे घटक. दुपारी एकत्र भोजन. परत आपापले काम. सायंकाळी परत भजन-कीर्तन. श्री गुरू नानक देव मग प्रवचन करत. रात्री भोजनानंतर परत भजन-कीतर्न व नंतर नामस्मरण करत. निद्रेच्या अधीन होते. सारे कसे ईश्वरीय वातावरण होते.

येणारे जाणारे यात्रेकरू, वाटसरू तेथे थांबत. त्यांचेही तेथे स्वागत असे. कोणी कोणास त्याची जात, वर्ण, पंथ विचारीत नसत. सारी एकाच परमेश्वराची लेकरे गणली जात.

**लेहणाजींचे आगमन –** लेहणाजी हे खदूरचे निवासी होते. ते देवी भक्त होते. देवीचे पुजारी होते. दरवर्षी ते खदूरच्या लोकांना ज्वालामुखी ह्या तीर्थक्षेत्री देवीच्या दर्शनासाठी घेऊन जात. एकदा ज्वालामुखीला जाताना वाटेत ते कर्तारपूरला थांबले. मुक्काम अर्थातच नानकांच्या आश्रमात झाला. नानकांचे भजन ऐकून लेहणाजी मंत्रमुग्ध झाले. ते नानकांकडे आकर्षित झाले. नानकांनीही त्यास पाहताच ओळखले. ते म्हणाले, ''तू लवकरच तुझे कर्ज चुकवण्यासाठी येथे कायम वास्तव्यास येशील. पंजाबीमध्ये 'लहिणा' ह्या शब्दाचा अर्थ घेणारा असा आहे. त्या शब्दावर ही कोटी होती तर तो एक भविष्यात घडणाऱ्या गोष्टीचा संकेतही होता. झालेही तसेच. लेहणाजी खदूरला जाऊन सर्व आवरा-आवरी करून लगेच कर्तारपूरला परत आले. आले तेच कायमचे. प्रथम गुरू नानक देवांचे शिष्य म्हणून तर नंतर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून.

**भाई बुढा –** कर्तारपूरमध्ये एक लहान गुरे वळणारा मुलगा होता. तो वयाने लहान होता. तो रोज श्री गुरू नानक देवांच्या प्रवचनास येऊन बसे. त्याची आकलनशक्ती जबरदस्त होती. त्यामुळे प्रवचनानंतर तो नानक देवांना एखाद्या परिपक्व प्रौढाप्रमाणे प्रश्न विचारी. नानक त्यास 'भाईबुढा' म्हणत. पुढे त्याचे तेच नाव विख्यात झाले. त्यास दीर्घायुष्यही लाभले. पाचवे गुरू श्री अरजन देवजी यांना आदिग्रंथाचे संकलनाच्या कामी त्यांनी मोलाची मदत केली. तेच पुढे हरिमंदिरात आदिग्रंथाचे पहिले ग्रंथी म्हणून नियुक्त केले गेले.

**मातृ पितृ वियोग –** करतारपूरचे दिवस आनंदात चालले होते. पण नियतीची पावले काही वेगळीच पडत होती. काळूरामांचे आता वय झाले होते. ते थकले होते. मुलाचे कर्तृत्व पाहून समाधान पावले होते. एके दिवशी शांतपणे (सन १५२२) त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या पाठोपाठ माता तृप्तादेवींनीही हा इहलोक सोडला. एकाच वर्षात हे दोन धक्के नियतीने श्री गुरू नानक देवांना दिले होते. 'इश्वरेच्छा प्रमाण मानून त्यांनी आपले धर्मकार्य पूर्ववत चालूच ठेवले.

**मरदानाचा मृत्यू –** भाई मरदाना हा श्री नानकांचा लहाणपणापासूनचा मित्र. तो नानकांपेक्षा दहा वर्षांनी मोठा. पण त्याने नानकांच्या लहानपणापासून त्यांना साथ दिली होती. उदासीमधील सर्व सुख-दु:खांच्या प्रसंगांत मरदाना व त्याचा रबाब यांनी गुरुदेवांची संगत केली होती. पण मरदानाही आता थकला होता. त्याने सत्तरी केव्हाच ओलांडली होती. त्याचीही अंतिम घटका जवळ आली आहे हे गुरुदेवांनी जाणले. एक दिवस ते मरदानास म्हणाले, ''मरदाना तू जन्माने मुस्लिम कुळात जन्मलास. तुझा अंतसंस्कार कसा व्हावा असे वाटते ?'' मरदाना म्हणाला, ''मी कोण आहे हे मी केव्हाच विसरलो आहे. माझे व्यक्तिमत्त्व मी तुमच्यात विलीन केले आहे. तुमचा धर्म तोच माझा धर्म. तुम्हास योग्य वाटेल तसा माझा अंत्यसंस्कार करा. अखेर तो दिवस उजाडला. मरदानाचा आत्मा अनंतात विलीन झाला. (सन १५३४). श्री गुरू नानक देवांनी त्याचा अंत्यसंस्कार हिंदू पद्धतीने म्हणजे दहन करून केला.

**अंगदाला गुरुपद**

मातृ-पितृ वियोग, नंतर मरदानाचा मृत्यू ह्या आघातानंतर श्री गुरू नानक देवांनी नियतीची चाल ओळखली. ते आता निरवानिरवीच्या मार्गाला लागले. त्यांनी लेहणाजींची आजपर्यंत नानाप्रकारे परीक्षा घेतली होती. त्या सर्वांत तो श्री गुरू नानक देवांना अत्यंत योग्य वाटला होता. त्यांनी मनाशी काही निश्चय केला.

एक दिवस त्यांनी आपल्या सर्व शिष्यांना एकत्र केले. लेहणाला समोर बोलावले व सर्वांना उद्देशून ते म्हणाले, ''आता लेहणा माझा 'अंगद' झाला आहे. अंगद ह्याचा अर्थ माझाच अंश झाला आहे. मी माझ्या साऱ्या शक्ती त्याच्यामध्ये संक्रमित केल्या आहेत. आजपासून हा तुमचा माझा गुरू झाला आहे.'' एवढे बोलून श्री गुरू नानक देवांनी त्यास गुरुपदी म्हणजे ज्या व्यासपीठावर बसून ते प्रवचन देत असत, तेथे नेऊन बसवले. त्यास केशरी गंधाचा टिळा लावला. त्याच्यापुढे पाच पैसे व विडा ठेवला. त्यास साष्टांग नमस्कार घातला व इतरांसही तसे करावयास सांगितले. त्या दिवसापासून लेहणाजी शिखांचे दुसरे गुरू श्री गुरू अंगद देव झाले.

श्री गुरू नानक देवांना दोन मुलगे होते. पण गुरुपदी बसवताना मात्र त्यांनी अंगददेवांची निवड केली हे लक्षात घेण्यासारखे आहे. आध्यात्मिक क्षेत्रात वारसदार निवडायचा तो आध्यात्मिक प्रगतीवरून, रक्ताच्या नात्याने नव्हे. हा एक फार मोठा संदेश त्यांनी ह्या प्रकारे दिला आहे. श्री गुरू अंगद देवांनीही ज्या आध्यात्मिक रचना केल्या त्यात शेवटी 'नानक' असाच शब्द वापरला आहे. त्यातून त्यांना हेच सूचित करावयाचे आहे की माझ्या मुखाने श्री गुरू नानक देवच बोलत आहेत. माझे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आले आहे. श्री गुरू नानक देवच मला माध्यम करून काम करत आहेत. हीच परंपरा पुढे सर्व शीख गुरुनी जोपासली आहे.

**अनंतात विलीन –** अखेर तो दिवस आलाच. आपली अंतिम घटकांजवळ आली आहे हे श्री गुरू नानक देवांना जाणवले. त्यांनी सर्वांना जवळ बोलावले. शिष्यांना शेवटचा उपदेश देताना ते म्हणाले, ''मी परत एकदा सांगतो. आपला मार्ग नामभक्तीचा मार्ग आहे. सदैव ईश्वराचे स्मरण असावे. मोहमायेपासून दूर राहावे. सदाचरणी असावे. अशा शिष्यांचे संघटन हे आपले कार्य आहे. ह्याचे कधीही विस्मरण होऊ देऊ नये. आता आमची घटका भरत आली आहे. आम्हास निरोप द्या.'' श्री गुरू नानक देवांच्या ह्या शब्दांनी साऱ्यांची मने हेलावली. वातावरण गंभीर झाले. श्री गुरू नानक देवांनी अखेरचा श्वास घेतला व त्यांचा आत्मा अनंतात विलीन झाला. (दि. २२ सप्टेंबर १५३९) श्री गुरू नानक देवांनी सर्व मानवजातीच्या कल्याणार्थ जो मार्ग दाखवला, त्या मार्गावर अग्रेसर होऊन आपले जीवन कृतार्थ करू या. त्या प्रभू परमात्म्याने आम्हास तशी शक्ती व बुद्धी द्यावी ही ईश्वरचरणी प्रार्थना! हीच श्री गुरू नानक देव यांचे चरणी आमची विनम्र आदरांजली.

॥ हरी ॐ ततसत ॥

**– विनायक लिमये**

**संदर्भ –**


१) सचित्र जीवन साखियां – डॉ. अजित सिंघ आलेख.
२) गुरू नानक देव – डॉ. अशोक प्रभाकर कामत.
३) गुरू नानक ते गुरू गोविंद सिंह – डॉ. अरविंद गोडबोले.
४) Atlas - Travels of guru nanak.
Fauja singh, kripal singh.
Publication Burcau, Punjabi University Patiala
५) Amazing Traves of Guru Nanak By Col. Dr. Dalvinder Singh Grewal
Dharam Prachar Committee
(Shiramani Gurudwara Parbandhak Committee) Sri Amritsar

# परिशिष्ट – २

## श्री गुरू अंगद देव यांचे संक्षिप्त चरित्र

श्री गुरू नानक देवांनी आपल्या हयातील आपले शिष्य श्री लेहणाजी यांना गुरुपदी विराजमान केले व त्यांचे नाव श्री अंगद देव असे ठेवले 'अंगद' ह्याचा अर्थ एकरूप झालेला. श्री लेहणाजी श्री गुरू नानक देवांशी इतके एकरूप झाले होते की जणू दोन शरीरात एकच ज्योत; म्हणून श्रीगुरू नानक देवांनी श्री लेहणाजींचे नाव अंगद असे ठेवले. हे गुरू अंगद देव शिखांचे दुसरे गुरू होत.

भाई लेहणाजींचा जन्म वैशाख शु. ११ संवत १५६१ (३१ मार्च १५०४) या दिवशी फरीदकोट जिल्ह्यातील 'मत्ते दी सराई' येथे झाला. सांप्रत त्या गावास 'सराईनाग' असे म्हणतात. त्यांच्या वडिलांचे नाव बाबा फेरूमल व आईचे नाव रोमो अथवा दया कौर असे होते. हे त्रेहान कुलातील होते. श्री फेरूमल हे पेशाने व्यापारी होते. पण मोगल व बलुची आक्रमकांच्या त्रासामुळे त्यांना अनेक वेळा आपले गाव सोडून परागंदा व्हावे लागले. अखेर ते 'खडूर' या गावी स्थायिक झाले. ह्या सर्व गोष्टींचा लेहणाजींच्या मनावर फार खोल परिणाम झाला.

लेहाणाजींचा विवाह संधर गावातील श्री देवीचंद यांची कन्या 'खिवी' यांच्याशी झाला. त्यांना दत्तू व दासू असे दोन मुलगे व अमरो ही मुलगी झाली. लेहणाजीही व्यापार करू लागले.

हे त्रेहान कुटुंब देवीचे भक्त होते. लेहणाजी खडूर येथील देवीच्या देवळाचे पुजारी होते. लेहणाजींचे वडील हे दर वर्षी ज्वालामुखी ह्या क्षेत्री दुर्गा देवीच्या यात्रेला खडूरहून यात्रेकरूंचा जत्था घेऊन जात असत.

इ. स. १५२६ मध्ये भाई फेरूमल यांचे निधन झाले व यात्रेच्या जत्थ्याचे नेतृत्व लेहणाजींकडे आले. पुढे काही वर्षे त्यांनी ज्वालामुखी यात्रेचेही नेतृत्व केले.

खडूर गावात जोधा नावाचा एक नानक भक्त राहत असे. एक दिवस पहाटे लेहणाजी गावच्या तळ्यावर स्नानास गेले असता जोधाचे एक सुंदर पद सुस्वर स्वरात त्यांचा कानावर पडले. जोधा गात असलेले ते पद असे –

**जितु सेविऐ सुखु पाईऐ सो साहिबु सदासम्हालीए ।।**
**जितु कीता पाईऐ आपणासा घाल बुरी किउ घालीऐ ।।**
**मंदा मूलि न कीचई दे लंमी नदरि निहाळीऐ ।।**
**जिउ साहिब नालि न हारीऐ तेवेहा पासा ढाली ऐ ।।**
**किछु लाहे उपरि घालीऐ ।।२१ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४७४)

पदाचा भाव असा की ''ज्याचे स्मरण केल्याने सुख प्राप्त होते, त्या प्रभू परमात्म्यास कधीही विसरू नये. जर जसे करावे तसे फल प्राप्त होते तर मग वाईट आचरण का करावे ? नीट विचार केला तर लक्षात येईल की चुकूनही वाईट कर्म करू नये. असे आचरण करावे की ज्यामुळे प्रभू परमात्म्याशी आपले नाते कधीही तुटणार नाही. मानवजन्मात असे काम करावे की ज्यामुळे मानवजन्माचे सार्थक होईल.'' हे पद ऐकून लेहणाजींच्या हृदयाची तार छेडली गेली. ते पद त्यांच्या अंतर्मनास जाऊन भिडले. त्याने जोधाकडे चौकशी केली तेव्हा ती रचना श्री गुरू नानक देवांची असून ते एक आत्मसाक्षात्कारी पुरुष आहेत. त्यांचा आश्रम रावी नदीच्या तीरी करतारपूर येथे आहे असे जोधाने त्यांना सांगितले. हे सर्व ऐकून लेहणाजींच्या मनात श्री गुरू नानक देवांचे दर्शन घेण्याची तीव्र ओढ निर्माण झाली.लवकरच तसा योगही जुळून आला.

दर वर्षीप्रमाणे ज्वालादेवीच्या यात्रेची वेळ आली. लेहणाजी यात्रेकरूंचा जत्था घेऊन निघाले. मजल दरमजल

करीत ते रावी नदीच्या किनारी पोहोचले. जत्थ्याची सोय लावून लेहणाजींनी श्री गुरू नानक देवांकडे जाण्यासाठी रावी नदी ओलांडली. त्या तीरावर त्यांना एक वृद्ध गृहस्थ भेटले. त्यांना लेहणाजींनी श्री गुरू नानक देवांचा पत्ता विचारला. तो वृद्ध म्हणाला, माझ्या मागून ये. दोघेही नानकांच्या घराजवळ पोहोचले. त्या वृद्धाने लेहणाजीस घोडा झाडास बांधून घरात जाण्यास सांगितले. लेहणाजींनी त्याप्रमाणे केले. त्या वेळी प्रार्थनाघरात अनेक शिष्य जमले होते. थोड्याच वेळात श्री गुरू नानक देव तेथे आले. त्यांना पाहून लेहणाजी आश्चर्यचकित झाले. कारण नदी किनारी भेटलेला वृद्ध गृहस्थ म्हणजे प्रत्यक्ष श्री गुरू नानक देवच होते. लेहणाजी खूप ओशाळले. त्यांनी श्री गुरू नानक देवांची क्षमा मागितली. त्या दिवशी सबंध दिवस लेहणाजींची श्री गुरू नानक देवांशी चर्चा झाली. श्री गुरू नानक देवांचे आचरण व आश्रमातील वातावरण पाहून त्यांची खात्रीच पटली की ज्याच्या शोधात आपण इतके दिवस होतो तेच हे आपले गुरू आहेत. हेच आपल्याला ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवतील. आश्रम सोडून जाताना त्यांनी श्री गुरू नानकांचे चरणावर डोके ठेवले व परत येण्याचा मनोदय व्यक्त केला. श्री गुरू नानक देव हसून म्हणाले, ''अरे तुझे नावच लेहणा (घेणारा) आहे व मी तर येथे तुला देण्यासाठीच बसलो आहे. तुला परत यावेच लागले.''

लेहणाजींनी ज्वालादेवीची यात्रा पूर्ण केली व ते खडूरला परत आले. पण आता त्यांचे चित्त संसारात रमेना. त्यांनी आपला व्यापार आपली मुले दत्तू व दासू यांच्याकडे सुपूर्त केला. पत्नी खिवी यांची समजूत घातली व त्यांनी करतारपूरला प्रयाण केले. जाताना त्यांनी, एक मिठाची गोणी घेतली होती. करतारपूरला पोहोचताच त्यानी ती गोणी लंगरमध्ये ठेवली व त्यांनी श्री गुरू नानक देवांची चौकशी केली. ते शेतात गेले आहेत असे कळताच ते तिकडे गेले. त्या वेळी लेहणाजींच्या अंगावर भरजरी रेशमी वस्त्रे होती. ते एखाद्या राजपुत्रासारखे दिसत होते. शेतात श्री नानक देव गवत कापत होते त्या गवतास सारा चिखल लागला होता. लेहणाजींनी श्री गुरू नानक देवांना प्रणाम केला. नानक त्यांना म्हणाले ''हा गवताचा भारा घेऊन चल.'' लेहणाने लगेच तो भारा डोक्यावर घेतला. मागोमाग श्री गुरू नानक देवही येत होते. गवताच्या भाऱ्यातून चिखलमय पाणी ठिबकत होते. त्याने लेहणाच्या भरजरी पोशाखास डाग पडले होते. ते पाहून माता सुलक्षणा देवी (श्री गुरू नानक देवांची पत्नी) नानकांना म्हणाल्या, ''काय हे! त्याच्या भरजरी पोषाखावर चिखलाचे डाग पाडलेत.'' श्री गुरू नानक देवजी म्हणाले, ''अगं हे चिखलाचे डाग नाहीत. ते केशराचे डाग आहेत.'' नानकांचा निर्देश लेहणाजींच्या गुरुभक्तीकडे होता. आणि लेहणाजींच्या मनातही गुरु सेवेचा आनंद होता.

लेहणाजी सन १५३२ ते सन १५३९ पर्यंत जवळजवळ सात वर्षे श्री गुरू नानक देवांची सेवा करीत राहिले. त्या काळात श्री गुरू नानक देवांनी श्री लेहणाजींची अनेक वेळा अनेक प्रकारे परीक्षा घेतली.

एकदा श्री गुरू नानकांनी लेहणाजीस विचारले ''किती रात्र झाली रे?'' त्यांचा रोख अज्ञान अंधकाराकडे होता. लेहणाजी लगेच उत्तरले, ''गुरुजी तुम्ही जितकी घालवलीत तितकी गेली, जेवढी तुम्ही शिल्लक ठेवलीत तेवढी राहिली.'' भाव असा की सतगुरुकृपेने जेवढे अज्ञान दूर झाले ते गेले बाकी अद्याप शिल्लक राहिले. ह्या उत्तराने श्री गुरू नानक देव प्रसन्न झाले.

श्री गुरू नानक देव भल्या पहाटे नदीवर स्नानास जात. त्यांचे अनेक शिष्य त्यांच्या समवेत जात. ते थंडीचे दिवस होते. नानक व शिष्य नदीवर पहाटे स्नानास निघाले. थंडी मी म्हणत होती. तशात पाऊस पडू लागला. सारे शिष्य झाडाच्या आसऱ्याला धावले पण श्री गुरू नानक देव पुढेच चालत राहिले. त्यांच्या मागे होते लेहणाजी. श्री गुरू नानक देव लेहणाजींना म्हणाले, ''अरे भिजतोस काय, गारठशील ना! जा एखाद्या झाडाचा आसरा घे.'' लेहणीजी उत्तरले, गुरुदेव तुम्हीच माझा आसरा आहात. तुमच्याशिवाय मी अन्य कोणाच्या आश्रयाला जाऊ?'' श्री गुरू नानक देव लेहणीची गुरुनिष्ठा पाहून आनंदित झाले.

ज्या धर्मशाळेत बसून सर्वजण कीर्तन करत, त्या धर्मशाळेची भिंत ऐन पावसाळ्यात रात्री कोसळली. श्री गुरू

नानक व शिष्य तेथे जमले. नानक म्हणाले, ''अरे ही भिंत ताबडतोब बांधून काढली पाहिजे. नाही तर सारी धर्मशाळाच पडेल.'' नानक निघून गेले. इतर शिष्यही, 'उद्या बांधू' असे म्हणत तेथून निघून गेले. पण लेहणाजींनी मात्र उद्याची वाट न बघता लगेच कामास सुरुवात केली व रातोरात भिंत बांधून पूर्ण केली.

एकदा श्री गुरू नानक देव, त्यांचे पुत्र श्रीचंद व लक्ष्मीदास, लेहणाजी व इतर शिष्य वाटेने चालले होते. शेजारी एक घाणीने भरलेले डबके होते. श्री गुरू नानक देवांचे हातातील लोटा चुकून (की मुद्दाम ?) त्या घाणीच्या डबक्यात पडला. श्री गुरू नानक देव आपल्या मुलांना म्हणाले, ''अरे, तो तांब्या कोणी तरी काढा रे!'' कोणीही त्या घाणीत उतरेना. पण लेहणाजी मात्र लगेच पुढे झाले. त्यांनी गुरू आज्ञा मानून ताबडतोब त्या घाणीच्या डबक्यात उतरून लोटा काढला. तो स्वच्छ घासून पुसून श्री गुरू नानक देवांच्या हाती दिला.

श्री गुरू नानक देवांनी लेहणाजींच्या अनेक परीक्षा घेतल्या. त्या प्रत्येकात ते पूर्णपणे निष्ठावान ठरले. त्यांची गुरूवरील निष्ठा व आध्यात्मिक प्रगती पाहून श्री गुरू नानक देवांची खात्री पटली की आपले कार्य पुढे नेण्यास लेहणाजीच योग्य आहेत.

एक दिवस त्यांनी आपल्या सर्व शिष्यांना एकत्र केले. लेहणाजींना पुढे बोलवून ते म्हणाले, 'हा लेहणाजी काया, वाचा, मने माझ्याशी एकरूप झाला आहे. तो माझा 'अंगद' झाला आहे. आजपासून यास सर्वांनी 'अंगद' असे म्हणावे. असे सांगून त्यांनी अंगदास आपल्या गुरू गद्दीवर बसवले. भाई बुढास त्याच्या कपाळी केशरी गंधाचा टिळा लावण्यास सांगितले. मग त्यांच्या पुढे पाच पैसे व नारळ ठेवून त्याला प्रदक्षिणा घालून नमस्कार केला व सर्वांना सांगितले की ''आजपासून अंगद हा तुमचा गुरू झाला आहे.'' मग सर्व शिष्यांनीही श्री गुरू अंगद देवांपुढे माथा टेकला. श्री गुरू अंगद देवांचा गुरुपदाचा सुरवातीचा काळ फार त्रासाचा व अडचणींचा गेला. त्यामुळे श्री गुरू नानक देवांनी त्यांना काही काळ अज्ञातवासात जाण्यास सांगितले.

**अज्ञातवास**

श्री गुरू नानक देवांनी श्री गुरू अंगद देवांना अज्ञातवासात जाताना एक पोथी दिली. त्यात त्यांनी स्वत: रचलेली पदे व इतर संतांची जमा केलेली पदे होती. त्यांनी श्री गुरू अंगद देवांना अज्ञातवासासाठी संघर येथे 'माई विराई' यांचे घरी जाण्यास सांगितले. तेथे श्री गुरू अंगद देव अज्ञातवासात सहा महिने राहिले. त्यांनी श्री गुरू नानक देवांनी दिलेल्या पोथीचा अभ्यास केला व अत्यंत उच्च अशी आध्यात्मिक पातळी प्राप्त केली.

**ही माई विराई कोण ?**

माई विराई ही जहागीरदार तख्तमल यांची कन्या. बाबा फेरूमल (श्री गुरू अंगदांचे वडील) हे काही काळ श्री तख्तमल यांच्याकडे मुनीम म्हणून काम करत होते. विराई ही बाबा फेरूमल यांची मानलेली बहीण होती. एकदा श्री गुरू नानक देव धर्म प्रचारार्थ संघरला आले होते तेव्हा माई विराईंनी त्यांना आपल्या घरी येण्याची विनंती केली. तेव्हा त्यांनी तिला सांगितले होते, की मी तुझ्याकडे बरेच दिवस मुक्कामासच येणार आहे पण पुढे. श्री गुरू अंगद देवांना पाहून माई विराईंना ते सारे आठवले व श्री गुरू नानक देवच श्री गुरू अंगद देवांच्या रूपाने आपल्याकडे मुक्कामास आले आहेत हे त्यांनी जाणले. श्री गुरू अंगद देवांचे त्यांनी स्वागत केले. त्यांनी श्री गुरू अंगद देवांची सर्व व्यवस्था केली व असा बंदोबस्त केला की कोणासही त्यांचा थांगपत्ता लागला नाही.

हा सहा महिन्यांच्या काळ श्रीगुरू अंगद देवांच्या जीवनातील फार महत्त्वाचा कालखंड होता कारण ह्या काळात त्यांची आत्मिक उन्नती पूर्ण झाली.

इकडे करतारपूर येथे सर्वजण बेचैन झाले. श्री गुरू अंगद देव कोठे गेले कोणासही कळेना. तशातच २२ सप्टेंबर

१५३९ ह्या दिवशी श्री गुरू नानक देव ब्रह्मलीन झाले. सारी शीख संगत विचारात पडली. पण भाई बुढाजींना मात्र श्री गुरू अंगद देव कोठे आहेत हे माहीत असावे. ते सर्वांना बरोबर घेऊन संघर येथे माई विराई कडे आले. प्रथम तिने ताकास तूर लागू दिला नाही. पण बुढाजींनी तेथे बैठक मारली. माई विराई म्हणाल्या, ''अशी जिद्द करणे ठीक नाही. गुरुजी केव्हा प्रगट व्हावयाचे ते जाणतात. ते योग्य वेळी प्रगट होतील.'' पण भाई बुढाजी असे हार मानणारे नव्हते. त्यांनी उत्तर दिले, ''ठीक आहे ! पण आपल्या गुरूचे स्मरण करणे तर गैर नाही ना ?'' त्यांनी बलवंड रबारीस रबाब वाजवण्यास सांगितले व त्या नादावर भजन-कीर्तन सुरू केले. ते ऐकून श्री गुरू अंगद देवांचे मन द्रवले व ते प्रगट झाले. पण त्यांनी करतारपूर येथे जाण्याचे मात्र नाकारले. ते खडूरला गेले. तेथे गावाबाहेर त्यांच्या एका शिष्याची मोठी जमीन होती. ती त्याने श्री गुरू अंगद देवांना दान दिली. तेथे लवकरच धर्मशळा व लंगरगृह बांधण्यात आले. आता श्री गुरू नानकांचे हजारो शिष्य खडूरला येऊ-जाऊ लागले. शिखांचे खडूर हेच प्रमुख स्थान झाले व कर्तारपूरप्रमाणेच येथे सर्व व्यवहार सुरू झाले. हळूहळू ते एक शहर म्हणून विकसित झाले व त्याचे 'गोईंदवाल' हे नाव रूढ झाले. तेथे सकाळी एक आध्यात्मिक बैठक (कीर्तन प्रवचन) होत असे. मग प्रभूस नेवैद्य दाखवल्यावर लंगर होत असे व लोक कामास लागत असत.

श्री गुरू अंगद देवांच्या दर्शनास येणारे अनेक लोक मोठमोठ्या देणग्या देत. त्यातून आश्रमाचा सर्व खर्च चाले. पण अंगद देव आपल्या चरितार्थासाठी त्यातील एक पैसाही वापरत नसत. ते आपला चरितार्थ दोरखंड वळून चालवत असत. त्यांचा भर व्यायामावर होता. त्यासाठी ते कुस्त्यांचे आखाडे भरवीत. ज्या ठिकाणी हा कुस्त्यांचा आखाडा भरे त्यास 'सराय नागा' असे नाव प्राप्त झाले. रुग्णसेवा कार्यात त्याना विशेष रुची होती. ते कुष्ठरोग्यांची सेवा करत.

बाबराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हुमायून दिल्लीच्या तख्तावर बसला. पण शेरशहाने त्याच्या विरुद्ध बंड केले. हुमायून जीव वाचवण्यासाठी लाहोरच्या दिशेने पळत सुटला. वाटेत खडूर लागले. तेथे श्री गुरू नानक देवांचे उत्तराधिकारी श्री गुरू अंगद देव असल्याने त्यास कळले. श्री गुरू नानक व बाबर यांची भेट झाली होती व त्या दोघात चांगले संबंधही होते हे त्यास माहीत होते. त्याने आपला मोर्चा श्री गुरू अंगद देवांच्या आश्रमाकडे वळवला. त्या वेळी आश्रमात गुरुदेवांचे प्रवचन चालू होते. बाहेरच्या सेवकांनी हुमायूनचा घोडा अडवला व त्यास पायउतार होऊन आत जाण्यास सांगितले. पण पराभूत होऊनही हुमायूनचा ताठा कमी झाला नव्हता. प्रवचन संपले. प्रचंड जनसमुदाय बाहेर पडताना पाहून श्री गुरू अंगद देवांची महती त्याच्या लक्षात आली. तो पायउतार होऊन श्री गुरू अंगद देवांच्या आश्रमात गेला. गुरुदेव कोणाशी तरी बोलत होते. चर्चा करत होते. बराच वेळ त्यांनी हुमायूनकडे लक्ष दिले नाही. हुमायूनला तो अपमान वाटला व त्याने आपला हात तरवारीकडे नेला. श्री गुरू अंगद देवांनी त्याच्याकडे पाहिले. त्यांचे तेज:पुंज व शांत मुखमंडल पाहून हुमायून मुग्ध झाला. त्याचा हात तरवारी पासून आपोआप दूर झाला. श्री गुरू अंगद देव त्यास एवढेच म्हणाले, ''हीच तरवार तू शेरशहा विरुद्ध उपसली असतीस तर बरे झाले असते. तुझी ही तरवार साधुसंतांच्या रक्षणासाठी व दुष्टांच्या संहारासाठी तुला दिली आहे.'' गुरूंचा तो उपदेश ऐकून हुमायून खजील झाला. गुरु देवांना वंदन करून तो निघून गेला. पुढे तयारी करून, शेरशहाचा पराभव करून परत दिल्लीच्या सिंहासनावर तो विराजमान झाला.

### गोसावी देव गिरी

पंजाब प्रांतात त्या काळी गोसावी देव गिरी नावाचा एक किमयागार राहत होता. तो कोणत्याही वस्तूपासून सोने बनविण्याची विद्या जाणत होता. त्याने तसे एक रसायन तयार केले होते.

एकदा तो श्री गुरू अंगद देवाकडे आला. त्याने लंगर चालू असलेला पाहिला. अनेक लोक येत होते. भोजन करून जात होते. तो श्री गुरू अंगद देवांना म्हणाला, ''गुरुदेव हा लंगर चालवण्यासाठी तुम्हास खूप खर्च येत असणार. मी आपणास एक रसायन देतो. त्यावर पारा मारलेला आहे. ते रसायन ज्यास चोळाल त्याचे सोने होते. मग काय तुम्हाला धनच धन प्राप्त होईल.'' गुरुदेव त्यास म्हणाले, ''आम्हास पारा मारण्याची आवश्यकता नाही. मन मारण्याची आवश्यकता

आहे. मन मारले, मनातील काम क्रोध आदी विकार मारले की प्रभू परमात्मा जीवास नामधन देतो. त्या धनाने सर्व सुखे प्राप्त होतात.''

गोसावी देव गिरी हे गुरूवचन ऐकून अंतर्मुख झाला. त्याला गुरू अंगद देवाची महती पटली व तो त्यांचा शिष्य झाला.

आता खडूरमध्ये सर्व व्यवस्था मार्गी लागल्या व शीख संप्रदाय वाढू लागला. अनेक लोक श्री गुरू अंगद देवांचे शिष्य झाले.

**गुरुमुखी लिपी**

त्या काळी पंजाबात 'लंडा' लिपी प्रचलित होती. त्यात काही दोष होते. त्यामुळे त्यात लिहिलेल्या श्री गुरू नानक देवांच्या रचना वाचताना अडचणी येत. उत्तर भारतात देवनागरी लिपी प्रचलित होती. त्यातील काही स्वर घेऊन श्री गुरू अंगद देवांनी एक नवीन लिपी निर्माण केली. हीच 'गुरुमुखी' लिपी होय. श्री गुरू नानक देवांनी श्री गुरू अंगद देवांकडे जी पद्य रचनांची पोथी सोपवली होती ती त्यांनी ह्या नव्या 'गुरुमुखी' लिपीत लिप्यंतरित केली. त्याच प्रमाणे श्री गुरू नानक देवांचे चरित्रही लिहिले. हे पंजाबी भाषेतील गुरुमुखी लिपीतील पहिले अधिकृत 'नानक चरित्र' होय.

गुरुमुखी लिपी प्रचलित व्हावी म्हणून त्यांनी खडूर येथे एक शाळा सुरू केली व प्राथमिक शिक्षणापासून ह्या लिपीचा प्रचार केला. त्याचप्रमाणे बाहेरून येणाऱ्या शिष्यांनाही त्यांनी गुरुमुखी लिपी शिकवण्याची व्यवस्था केली. त्यामुळे शीख संप्रदायाला एक वेगळी अस्मिता प्राप्त झाली. पण ह्यामुळे शीख धर्म वाङमय शिखांपुरतेच मर्यादित राहिले. ते अन्य भारतीयांपर्यंत पोहचू शकले नाही.

**अनुशासन व नम्रता**

श्री गुरू अंगद देवांचा अनुशासन व नम्रता ह्या गुणांवर विशेष भर होता. प्रत्येकाने आपले काम व्यवस्थापूर्वक व विनम्रभावाने करावे अशी त्यांची शिकवण होती.

महाणा हा एक लंगर व्यवस्थेतील प्रमुख सेवेकरी होता. पण त्यास अहंकार झाला. जणू आपल्यामुळेच हा लंगर चालला आहे, आपणच ह्या सगळ्यांना पोसतो आहोत असे त्यास वाटू लागले. तो प्रसादासाठी येणाऱ्यांशी उद्धटपणे वागू लागला. श्री गुरू अंगद देवांनी त्यास समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, ''अरे लंगरमध्ये जे भोजन दिले जाते तो प्रभू परमात्म्याचा प्रसाद असतो. प्रभुकृपेनेच तो लोकांना प्राप्त होतो. लंगरमधील सेवा ही प्रभुसेवा आहे व समोर बसलेले लोक ही प्रभूचीच रूपे आहेत. त्यांची सेवा करण्याची संधी प्रभूने तुला उपलब्ध करून दिली आहे ह्या बद्दल तू त्या प्रभूचे आभार मान व विनम्रभावाने तू आपले कार्य कर'' पण त्याचा महाणावर काहीही परिणाम झाला नाही. त्याच्या वर्तनात काही बदल झाला नाही. शेवटी गुरुदेवांनी त्यास हाकलून लावले.

श्री गुरू अंगद देवांच्या संगतीत सत्ता व बलवंड हे दोघे भाट होते. ते श्री गुरू अंगद देवांच्या प्रार्थना सभेत गुरुवचनाचे गायन करीत. त्यांचा आवाज व गाण्याचा ढंग अत्यंत मधुर होता. त्यामुळे ते श्री गुरू अंगद देवांचे लाडके झाले होते. पण त्यामुळेच ते फार शेफारून गेले होते. ते स्वत:ला फार मोठे समजू लागले होते व त्यामुळे ते अन्य लोकांना तुच्छ मानून त्यांच्याशी उद्धटपणे वागू लागले. शेवटी शेवटी तर ते इतके उन्मत्त झाले की प्रत्यक्ष श्री गुरू नानकांविषयीही ते वाईट बोलू लागले. मग मात्र श्री गुरू अंगद देवांनी त्यांना हाकलून दिले. पुढे त्यांना पश्चात्ताप झाला व ते श्री गुरू अंगद देवांना शरण गेले. व लोकांशी अत्यंत नम्रतेने वागू लागले. त्यांनी रचलेली आठ पदे ही श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

**उदासी पंथ व नानक पंथ**

श्री गुरू नानक देव यांचे पुत्र श्री लक्ष्मीचंद हे विरागी वृत्तीचे होते. त्यांच्या विषयी नानक भक्तात आदरही होता.

त्यांना ईश्वरप्राप्तीसाठी संसारापासून विरक्त होणे आवश्यक आहे असे वाटे. त्यांच्या पंथाला 'उदासी पंथ' असे म्हणत. पण श्री गुरू नानक देवांच्या मताप्रमाणे संसारात राहूनही प्रभू प्राप्त करता येतो. श्री अंगद देवांनी हा भेद स्पष्ट करून 'नानक पंथ' हा 'उदासी पंथा'पासून वेगळा आहे हे लोकांना दाखवून दिले व नानक पंथाची स्वत:ची अशी अस्मिता निर्माण केली. हे श्री गुरू अंगद देवांच्या कार्याचे वैशिष्ट्य होय.

श्री गुरू नानक देवांप्रमाणे श्री अंगद देवांनीही पद्य रचना केली आहे. त्यांच्या ६२ रचनांचा श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये समावेश केला गेला आहे. त्यांच्या रचना संख्येने कमी असल्या, तरी त्या अत्यंत आशयगर्भ आहेत. त्यातील एक नमुना उदाहरणासाठी खाली दिला आहे. ते सांगतात.

**चाकरु लगै चाकरी नाले गारबु वादु ।**
**गला करे घणेरिआ खसम न पाए सादु ।।**
**आपु गवाइ सेवा करे ता किछु पाए मानु ।**
**नानक जिस नो लगा तिसु मिलै लगा सो परवानु ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४७४)

प्रभुसेवकाचे कर्तव्य प्रभुसेवा करणे हे आहे. ते त्याने शांतपणे करावे. उगाच कोणाशी गर्वाने वितंडवाद घालू नये. जर तो अहंकारपूर्वक खूप बडबड करील तर त्याच्यावर प्रभू परमात्मा कधीही प्रसन्न होणार नाही. जो अहंकाराचा पूर्णपणे त्याग करून काया, वाचा, मने प्रभू परमात्म्याची सेवा करील, त्यास प्रभू परमात्म्याच्या दरबारी सन्मान प्राप्त होईल. नानक सांगतात, अशा प्रभुसेवकाचा प्रभू परमात्मा स्वीकार करतो व त्यास आपल्यात सामावून घेतो.

जेव्हा आपले जीवनकार्य संपत आले आहे ह्याची श्री गुरू अंगद देवांना जाणीव झाली, तेव्हा त्यांनी त्यांचे वयोवृद्ध शिष्य अमरदास यांना गुरुपदी विराजमान करून २९ मार्च १५५२ रोजी ह्या जगाचा निरोप घेऊन ते प्रभुरूपात विलीन झाले.

श्री गुरू अंगद देव हे सन १५३९ ते १५५२ सुमारे तेरा वर्षे गुरुपदी होते. त्या काळात त्यांनी लंगर पद्धतीचा विकास केला. गुरू नानकांच्या चरित्राचे लेखन केले. पंजाबी भाषेस गुरुमुखी लिपी दिली. अशा रीतीने शीख धर्माचा भक्कम पाया घातला. ते श्री गुरू नानकांशी पूर्णपणे एकरूप झाले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या रचनांच्या शेवटी स्वत:चा नामनिर्देश न करता 'नानक सांगतात' असा केला आहे. त्यानंतरच्या गुरूंनीही तीच परंपरा चालवलेली दिसते.

श्री गुरू अंगद देवांच्या ह्या कार्यामुळे श्री गुरू गोबिंद सिंघजीनी "**सिक्ख नही कोई अंगद जेसा**" असे चपखल वर्णन केले आहे.

।। हरी ओम तत्सत् ।।

**विनायक लिमये**

**संदर्भ :**

१) गुरू नानक ते गुरू गोविंद सिंग
ले. डॉ. अरविंद गोडबोले, प्रकाशक-भारतीय विचार साधना

२) गुरू अंगद देव ते गुरू तेग बहादर
लेखक डॉ. अशोक कामत, प्रकाशक-गुरुकुल प्रतिष्ठान

३) सचित्र जीवन साखियां, भाग २
लेखक व प्रकाशक-भाई चतरसिंघ / जीवनसिंघ